


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६५ वे * अंक ३० * नांदेड * रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211





# मोहोळ

कोंबडच्यानं बाक दिली अन् तांबडं फुटण्याच्या मार्गांवर होतं. तसा रामू जागा झाला अन डोळ्यावर पाणी मारत आपल्याच अंगावरच्या कपड्याने पुसत होता. मग बाजूलाच पडलेली कुऱ्हाड त्याने उचलली आणि तो घराबाहेर पडला.मनाशीच काहीबाही बोलत तो चालत होता. गावाच्या शेजारीच एक घनदाट जंगल होतं. तो आता जंगलात शिरला होता. मोराचा आवाज कानी निनादत होता. जंगलातली शांतता त्याला जाणवत होती. जंगलात नाना प्रकारची झाडे होती. तो एखादं वाळलेलं झाड नाहीतर खोड शोधत होता. तसा तो सैरावैरा नजरेनं शोधू लागला. काही अंतरावर गेल्यानंतर त्याला एक वाळलेलं झाड त्याच्या नजरेस पडलं. तसा तो लगबगीनं त्या झाडाजवळ गेला.झाड तसं पार वाळून गेलं होतं. रामू त्या झाडावर कुऱ्हाडीने घाव घालू लागला.झाड काही उंच नव्हतं,आखूड अन छोटसं होतं. रामुने ते झाड बुडापासून तोडलं.मग त्या झाडाच्या फांद्या तोडून सर्वांचे बारीक बारीक तुकडे केले अन त्याचा भारा तयार केला.त्याला थोडा थकवा जाणवत होता.तसा तो विश्रांती घेण्यासाठी खाली बसतो.त्याक्षणी त्याला शेजारच्या बाभळीच्या झाडावरील मोहोळाकडे जाते.रामू पटकन उठतो अन् त्या झाडावर जाण्याचा प्रयत्न करतो,वरवर चढू लागतो.चढताना त्याच्या हाताला, पायाला काटे टोचत होते.एक काटा तर पायात टोचला अगदी रुतून बसला, तरीही रामू मोठ्या धीरानं मोहोळापर्यंत पोहचला. मोहोळ एका छोट्या फांदीवर होतं. रामू त्या फांदीजवळ हात नेण्याचा प्रयत्न करत होता.थोड्याबहुत कष्टाने मोहोळापर्यंत हात नेतो अन ताडकन ती फांदी ओढतो. फांदी चिकट होती, तुटता तुटत नव्हती.रामू तिला खाली-वर, खाली-वर करून तोडत होता.तोवर मोहोळाच्या मधमाश्या सावध झाल्या.काही खाली पडल्या अन परत उडत वर आल्या आणि मोहोळाजवळ घोंगावू लागल्या.त्यातल्या काही तर रामुला आपल्या विषरी काट्याने डंख मारत होत्या. रामूने मग जोरात त्या फांदीला हिसका मारला अन ती फांदी तुटली. पण बाजूच्या फांदीचे काटे त्याच्या हातात टोचले, अन् त्यातून भळाभळा रक्त येऊ लागलं, हात तर खूप दुखत होता. तरीही रामू वाट मिळेल तिकडून खाली उतरू लागला अन् आजूबाजूच्या फांदीचे काटेही त्याला तोचत होते. तो तसाच खाली उतरला. मोहोळाची फांदी हातात धरून तो तोडून जमा केलेल्या लाकडा पर्यंत चालत गेला. हातात रुतलेल्या काट्यामुळे त्याला खूप वेदना होत होत्या. त्याने मोहोळ हळूच त्या लाकडाच्या वर ठेवलं अन् हातात रुतून राहिलेला काटा त्याने ओढून काढला..रक्त काही करता थांबत नव्हतं, मग रामूने खालची थोडी माती उचलली अन लावली त्या हातावर..लाकडं तर तोडून जमा केली होती, पण भारा कशाने बांधणार,तो आजूबाजूला पाहू लागला,त्याला एका झाडावर चढत गेलेला वेल दिसला. जवळची कुऱ्हाड घेऊन तो त्या वेलाला तोडून आणतो आणि भारा बांधतो.

सूर्य हळू हळू वर डोकं काढत होता अन अंधाराला दूर सारत तो प्रकाश पसरवत होता.रामुने आपली कुऱ्हाड त्या भाऱ्यात खोसली, अन भारा डोक्यावर उचलून घेतला.मोहोळ एका हातात घेऊन, एका हाताने भाऱ्याला धरत तो गावची वाट चालत होता.झपझप पावलं टाकत तो पायवाटेनं गावात पोहोचला.डोळ्यावरचा भारा आता जड वाटत होता तरीही तो उरलेल्या ताकतीनिशी तसाच टोक्यावर घेऊन चालत होता.हात गळून आला की मोहोळाची फांदी तोंडात धरायचा अन दुसऱ्या हाताने भारा धरायचा, असं करत तो गावात आला होता.

रामुला धनु सावकारानं काल सरपण आणाय सांगितलं होतं.म्हणून तो थेट धनू सावकाराच्या घरी जाऊन थांबतो. रामुने आवाज दिला, 'सावकार अव सावकार, दोन चार हाका ऐकल्यावर सावकाराची बायको बाहेर येते अन रामूला बोलू लागते, 'रामू आणलास का सरपण, बरं केलंस बाबा लवकर आणलंस, आज चूल पेटवाय सरपणच नव्हतं बघ, हितं टाक भारा, तसा रामू भारा खाली टाकतो.

रामूच्या हातातलं मोहोळ पाहून सावकारीन रामुला म्हणते, 'रामू हे मोहोळ आमच्या पिंटूला दे बर रामू : पर मालकीण मी हे माज्या लेकराय साठी आणलं हुत, घरी दाणा नाय ,लेकरं उपाशी हाईत माजी, सावकारीन : 'आर पर मी चार पैसे देते की त्याचं, सरपणाचे अन् मोहोळाचे मिळून जास्त पैसे होतील, अन् थोडे तांदूळ बी देईल,' (रामूला डोळ्यासमोर लेकरं दिसत होती, मोहोळाने काय होणार,,,तांदूळ नेले तर आजचा दिवसाच भागल तरी, अन् पैसे बी उरतील,) रामूला शेवटी पैसे अन् तांदुळापायी होकार भरावा लागला, सावकारीन मोहोळ घेऊन घरात गेली अन् एका पिशवीत तांदूळ टाकून आणले, सरपणाचे अन् मोहोळाचे पैसे बी रामूला दिले. तसा रामू खुश झाला, अन् गडबडीत घराचा रस्ता धरून चालू लागतो.

इकडे घरी रमणीने झोपडीतला सारा आवार पांढऱ्या मातीनं अन् शेणाने सारवून घेतला होता. अंगणात शेणाचा सडा शिंपडला होता. दोन्ही लेकरं उठून तोंड धुवत होती, रमणी दारात बसून लेकराकडे पाहत बसली होती, आपल्याच विचारात मग्न होती..आज लेकरायला काई खायला मिळतं की नाई म्हणून ती चिंतातुर होती...तेवढ्यात लेकरं बाबा आले, बाबा आले म्हणत रामूकडे पळत जातात..रमणी भानावर येते, अन् उभी राहते.

रामू तांदूळ घेऊन घरात येतो अन् रमणीला म्हणतो, 'रमणी आज लेकरायले खायला मस्त भात वरण कर बरं...

आज रामू आणि रमणी दोघेही खुश होते कारण आजच्या दिवसाचं त्यांचं अन लेकरांच भागलं होतं अन् थोडेबहुत पैसेही मिळाले होते, एवढ्यावरच ते समाधानी होते...

संध्याकाळची वेळ होती, रामू लगबगीन रस्ता तुडवित गावाकडे निघाला होता.ढगाळ वातावरण असल्याने गडद अंधार लवकरच पडला होता. तसाच तो गडबडीने घरी पोहोचला. घर एक पडकी झोपडी होती. पाऊस थेंब थेंब करत यायला सुरुवात झाली. तसा रामू परेशान झाला .त्याला आज त्याच्या झोपडीवर गळणाऱ्या जागी पाचट टाकून तिची मरम्मद करायची होती. पण नात्यातील कुणीतरी मरण पावल्यामुळे तो त्याच्या अंत्यविधीसाठी गावाला गेला होता.

रामूने अंघोळ करून लगेच झोपडी ची मरम्मद करू लागला. त्याची छोटी छोटी दोन मुले तशीच एका कोपऱ्यात झोपी गेली होती. त्याची बायको रमणी त्याला मदत करत होती. रामूने पाचट गोळा करून घेतल होतं. तसाच तो झोपडी वर चढला अन रमणी त्याला खालून पाचट देत होती. रामूने साऱ्या झोपडी ची पूर्ण मरम्मद केली अन तो खाली उतरून तसाच आडवा झाला.

बाजूला बसून रमणी त्याला म्हणत होती. नकर दोन घास खाऊन घ्या धनी. रामू काहीच बोलेना..तो विचारात होता त्याच्या... उद्या आपली चूल कशी पेटल, आपली दोन्ही लेकर अन् बायको कशी पोटभर अन्न खाऊ शकतील...

रमणीने त्याला हलवत विचारलं, काय झालं धनी, कनच्या ईचरात हायसी... आजच भागलं न बघुया उद्याच उद्या, काले तुमी परेशान होता अन् मी हाय ना व सोबतीला ..व्हय होईल समद ठीक...देव आपली परीक्षा घेतोय...त्यात आपल्याले खर उतरायचं हाय...जाऊ द्या ..आता लई ईचार करू नका ..दोन घास खाऊन घ्या अन पडा आडवं. तसा रामू होकारार्थी मान हलवून जेवण करतो अन् तसाच बाजूला आडवा पडतो...


**-विजय नारायण वाठोरे**
सरसम (बु)
ता. हिमायतनगर जि. नांदेड
मो. ९९७५५९३३५९

# विवंचना : जात व्यवस्थेला उघडं करणारा प्रेमशोध!

पुस्तक परिचय
**प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये**
कै. रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि. परभणी
मो. ९१५८०६४०६८

आज वैचारिक चळवळ पुनरुज्जीवित होतांना वाचन-लेखन क्षेत्रात नवनवीन सृजन आपला विचार कथा, कविता, कादंबरी, ललित, वैचारिक लेखनातून मांडत आहेत. नव्या पिढीतील उदयोन्मुख कादंबरीकार डॉ. कोंडबा हाटकर छ.संभाजीनगरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठात पोस्ट डॉक्टरेट करणारे आंबेडकरी चळवळीतील बंडखोर लेखक आहेत. त्यांची पहिली 'बेदखल' कादंबरी बरीच खळबळ करून गेली असून विवंचना ही दुसरी कादंबरी आज प्रकाशित होत आहे.

संभाजीनगरच्या कैलास पब्लिकेशन प्रकाशित 'विवंचना' कादंबरीचे मुखपृष्ठ श्री सरदार जाधव यांनी उत्तम बनवले असून कादंबरी वाचल्याशिवाय मुखपृष्ठ उलगडत नाही. डाव्या बाजूला एक गोरा चेहरा आणि उजव्या बाजूला काळा चेहरा. समोरासमोर नाक-ओठ भेटत आहेत आणि त्याखालून ज्वालाग्नी भडकला आहे, वर काटेरी निवडुंगाच्या टोकावर छान फुलं उमललीत, आकाशात सुंदर चंद्रकोर आहे. हे बोलकं मुखपृष्ठ कादंबरीचे अंतरंग उलगडते.




लेखक उच्चशिक्षित बेरोजगारी व्यवस्थेचा बळी, लेखनावर चरितार्थ भागवतोय. कोणतीही कलाकृती ही लेखकाच्या भोवतालाचे अपत्य असते. लेखकावर शिवराय, फुले, शाहू, आंबेडकर, साठे आणि वारकरी संप्रदायाचा प्रभाव जाणवतो. कादंबरी संत तुकाराम यांच्यातील देहू नगरीतून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या पंढरीच्या पांडुरंगास अर्पण केली आहे. यवतमाळचे प्रा.माधव सरकुंडे यांची प्रस्तावना आहे.

विवंचना कादंबरी दोन भागांमध्ये विभागली आहे. कादंबरी कल्पना आणि सत्य याचा संगम असते. कादंबरीकार हा सर्व कर्ता-धर्ता असतो. वर्तमान घडामोडी-अनुभूतींनी कल्पना विकसित होतात. सुरुवातीपासूनच कादंबरी वाचकाला खिळवून ठेवते. कादंबरी ही प्रेम कथा जरी असली तरी; इथल्या जात व्यवस्थेचं विदारक चित्रण करणारी समाज व्यथा, वर्तमान व्यवस्थेला प्रश्न विचारणारी गाथा आहे! अकाली वैधव्य आलेल्या चाळीशीतील राधाबाई भाऊसाहेब देशमुख. त्यांना विकास आणि रेशमा अशी दोन अपत्ये, त्यात विकास व्यसनामुळे मुंबईला पळून गेलाय. रेशमा मात्र अभ्यासू, होतकरू, हुशार, सोज्वळ, प्रेमळ, सुंदर, सालस आणि खेळात तरबेज. रेशमाच्याच वर्गात गावातीलच अशोक मोतीराम कांबळे शिकायला आहे. विरोधी लिंगामध्ये आकर्षण असते. दोन तरुण मने एकमेकांकडे आकर्षित होतात. बारावीचे वर्ष येतं. रेशमा आणि अशोकचा खो-खो खेळतानाचा प्रसंग कादंबरीला हलकीशी प्रेमळ फुंकर देतो. अशोकला धप्पा मारण्याचा नादात रेशमा त्याच्या अंगावर पडते. अशोकचे नाक फुटते आणि रेशमालाही कोपर-गुडघ्याला लागतं. रेशमा मनाला लावून घेते आणि अशोकही दोन दिवस शाळेत येत नाही. त्यानंतर अशोक रेशमाची भेट होते आणि दोघेही एकमेकांबद्दल सहानुभूती दाखवतात. त्यात रेशमा आपली मॅक्सी वर करून गुडघ्याला झालेली जखम दाखवते. हळूहळू या दोघांमध्ये प्रेमआग पेटते. तरुण रेशमा वयात आल्यामुळे आणखीणच सुंदर दिसते. अधूनमधून तिच्या स्वप्नात अशोक यायला लागतो.

रेशमा-अशोक सोबतच बारावी कला शाखेत प्रवेश घेतात. देशमुखांच्या वाड्यावर सासरे सर्जेरावांचे लक्ष असले तरी वाड्यात अनेक बऱ्या-वाईट घडामोडी घडतात. राधाबाई तरुण-सुंदर असल्यामुळे त्यांचा दीर बाजीराव त्यांच्यावर जबरदस्ती करतो. तिकडे ग्रंथालयात अशोक शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिराव फुले वाचतो. दलित कुटुंबातून आलेला अशोक उंचा-पुरा, टॉप-टीप, नीटनेटका गरीब घरचा असला तरी आपल्या शिस्तीत राहणारा मुलगा, परिणामी मुली त्याच्याकडे आकर्षित होतात, पण तो मुलींना दाद देत नाही. असे असले तरी रेशमा-अशोक मात्र एकमेकांवर प्रेम करू लागतात. कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' कविता त्यांना आणखीच जवळ आणते. एकदोनदा ते कॉलेजच्या छतावर भेटतात. राधाबाईच्या वाड्यात रेशमाच्या लग्नाची चर्चा होते. गावात संपत महाराजांचे कीर्तनं होतात. संपत महाराज आणि गोकर्णाबाईचे संबंध उजागर असतात. बाजीराव राधाबाईंना वारंवार बळजबरी करतो. मर्यादेत राहणाऱ्या राधाबाई अमर्याद होतात. त्यांना शरीर सुखाची चटक लागते. राहणीमान बदलते. त्या संपतबुवाकडे आकर्षित होतात. बारावीतील रेशमा वाड्याचे शहरात नाव करते आणि डिग्री शिक्षणासाठी शहरात जाते. तिथे अशोक-रेशमा एकाच वर्गात, एकमेकांवर प्रेम करू लागतात. राधाबाई संपतबुवांच्या नादी लागतात. त्यांना रेशमापासून सुटका हवी असते. घाईघाईने संपतबुवांच्या मदतीने दूरच्या एका श्रीमंत, वयस्कर, व्यसनी, बाहेरख्याली दौलतशी रेशमाचे लग्न होते. दौलत-श्रीमंत किळसवाणे पात्र सुंदर, सालस रेशमाला त्रासून टाकते. विवाहाला अशोक येत नाही. गावात रेशमा-अशोकच्या प्रेमाची चर्चा आणि तो दलित असल्यामुळे त्याचे घर उध्वस्त होण्याच्या भीतीपायी अशोक मित्राकडे निरोप देऊन मुंबईला पळून जातो. इकडे रेशमाच्या मधुचंद्राच्या रात्री दौलत तिला बळजबरी दारू पाजण्याचा, तीच्यावर अमानुषपणे अत्याचार करतो. सर्वांगाला सिगारेटचे चटके देतो. रेशमाला असह्य होते आणि पहाटे पहाटे ती घरातून पळून जाते. आता सुरु होते खरी विवंचना!

रेशमा आपला प्रियकर अशोकच्या शोधात अहोरात्र भटकते. अंगावरील सोने मोडून पुणे गाठते. पुण्यात वेशा व्यवसाय करणाऱ्या सलमाची भेट होते. तिच्यासोबत जायला रेशमा नकार देते. अशोकच्या भेटीसाठी ती आतुर असते. ती मुंबई फिरते. सर्व प्रवास ती रेल्वेने करतांना टीटीची नजर चुकवत जाते. त्यातच अशोक हा बौद्धगयेला तर गेला नसेल? या प्रश्नामुळे ती वाराणशी गाठते. तेथील संगमावरील थोतांड, भोंदुगिरीला ती वैतागते. काशिविश्वेश्वराचे मनोभावे दर्शनात अशोक भेटण्याची याचना करते. बौद्धगयेला जाऊन अशोक भिखू तर झाला नसेल? याचा शोध घेते. प्रेमाच्या शोधात रेशमा अनंत प्रसंगांना सामोरी जाते. मुंबईत भिकाऱ्यांच्या सोबत राहते. तिचा प्रियकर शोधाचा प्रवास मोठा खडतर आहे. कादंबरीकार रसिक असून बऱ्याच ठिकाणी कामातुर झालेल्या भिकारी जोडप्यांचे प्रसंग रेखाटतो. तिकडे राधाबाई-संपतबुवा राजरोसपणे यात्रे-जत्रेला जातात. देशमुखाच्या वाड्याचा भायाभंग होतो. रेशमाने आपल्या तोंडाला काळे फासले. ती कांबळेच्या अशोक्यासोबत पळून गेली अशी सगळीकडे चर्चा होते. गावात कांबळेंचे कुटुंब जीव मुठीत धरून दिवस काढतांना आपला अशोक कुठं गेला असेल? या विवंचनेत असते.

अनेक चढ-उतारातून जातांना डॉ.हाटकर यांची कलाकृती वाचकांस पकडून ठेवते. अशोक-रेशमाचे प्रेम पवित्र आहे; यासाठी लेखकाने खूप कष्ट घेतांना या दोन्ही पात्रांना कुठेही बट्टा लागू दिला नाही. शेवटी अशोक-रेशमाचे मिलन होते का? गावातील लोक दलित असणाऱ्या कांबळेचे घर उधवस्त करतात का? आणखी काय काय होते? हे जाणून घ्यायचे असेल तर विवंचना वाचलीच पाहिजे.

सज्जनहो, आज स्वातंत्र्याची ७५ वर्षे ओलांडूनही इथली जात व्यवस्था माणूसपण मानायला तयार नाही. ऑनर किलिंग सारखे अमानुष गुन्हे राजरोस घडतांना माणसाला माणूस म्हणून किंमत नाही. सृष्टीने सर्वांना सारखेच निर्माण केले असतांना माणसातील जातीने अमानुष राक्षस जिवंत ठेवला आहे; हे विदारक चित्र कादंबरीत पावलोपावली दिसते. दुसरीकडे प्रेम जात, धर्म भेद मानत नाही याची साक्ष अशोक-रेशमाच्या प्रेम आणि विवंचनेतून समजते. जातीतील माणसेच जातीची माती करतात हे प्रकर्षाने जाणवते, तरीही इथली कडेकोट जात व्यवस्था तुटायला तयार नाही(?) या प्रश्नाने मन विषन्न होते. अनेक संत, महापुरुषांनी जातीला आव्हान देऊन केवळ माणूस म्हणून माणसाला वागवण्याचे सांगितले असतांना लोकांनी त्या महापुरुषांनाही जाती-धर्मात वाटून घेऊन त्यांच्या विचारांचा गळा घोटण्याचे अमानवी कार्य केले आहे! असे अनंत प्रश्न वाचकांसमोर उपस्थित करून कादंबरी संपते.

# मानव कल्याणाचा संदेश देणारे जगद्गुरु रविदासजी महाराज



संतगुरु रविदासजी महाराज यांचा जन्म शिर गोबर्धनपूर बाराणसी येथे माघ पौर्णिमेच्या दिवशी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव संतोषदासजी व आईचे नाव कलसीदेवी असे होते. तर पत्नीचे नाव लोगादेवी असे होते. त्यांच्या पुत्राचे नाव विजयदास असे होते. बालपणापासूनच सतगुरू रविदासजी महाराज यांना ईश्वर भक्ती व सेवेची ओढ होती. ६०० वर्षांपूर्वी त्यांचे ५२ राजे-राणी शिष्य होते. त्यात संत मीराबाई, झालाबाई, कर्माबाई, राजा पिपा, राजा सिकंदर लोधी, इब्राहीम लोधी, राजा संग्राम, राजा वेणुजी असे राजे महाराजे त्या काळात त्यांचे शिष्य बनले होते.

सतगुरू रविदासजी महाराजांच्या काळात उच्च-निच असा भेदभाव होता. हा भेदभाव लक्षात येऊन आणि ही परंपरा बंद व्हावी या उद्देशाने त्यांनी ईश्वराचा अवतार घेऊन बेगमपुराची संकल्पना मांडली.

**ऐसा चाहूं राज मै, जहां मिले सवन को अन्न।।**
**छोट बडो सब सम बसे रविदास रहे प्रसन्न।**

हा मानवाला संदेश देणारे जगत गुरू रविदास महाराज सारे जीयों में हरि है और सब जीय हरी में विद्यमान है, इस भेद को केबल उसने ही। जाना है। जिसने हरि को जान लिया है। उस हरि के समान कोई दूसरा और नही है। उस हरी की समझने वाला इस संसार में उत्तम है। अशा प्रकारे महाराजांनी मानव जातीला सृष्टीचा मालीक एकच असून तो बाहेर नाही तो सर्व प्राणीमात्रामध्ये विराजमान आहे तो सृष्टीचा नायक एकच आहे असा संदेश दिला आहे. महाराजांना बालपणापासून ज्ञान प्राप्त झाले होते.

न रख मंदिर,
न रख मजिद ।।
मिले सलूरु द्वार
रच्च सर्व व्यापक
इक जीत आप
जीत निरंकार ।।

महाराज सांगतात की, विभिन्न जाती, धर्माचे गट पाहून घेऊन हिंदू मंदिरात जाऊन आपला देव शोधत आहे. मुसलमान मशीदमध्ये जाऊन नमाज अदा करुन तो त्यांच्या अल्लाला म्हणजे रथ शोधत आहे. तर प्रत्येक जाती-धर्मातील लोक आपल्या पध्दतीप्रमाणे देवाला शोधण्यात गुंग आहेत. सतगुरु रविदासजी महाराज सांगतात की, तुम्ही प्रत्येकांनी आपापल्या धर्म परंपरेनुसार देव शोधत असाल तरी तुमचा सर्वांचा परमात्मा निर्गुण निराकार एकच आहे. या जगाचा सृष्टीचा पालनकर्ता एकच आहे. तुम्ही सृष्टी निर्मात्याचेच लेकरे आहात. अज्ञानामुळे आपापसात, माणसा-माणसात जातीधर्माची दरी निर्माण करून घेतला आहात. तुम्ही मुसलमान असाल किंवा हिंदू असाल किंवा वेगवेगळ्या धर्माचे असाल, तरीही तुमच्या अंतःकरणाला तुमचा कर्ता करबिता एकच आहे. विषवदृष्टी माझ्या मनात कधीही उत्पन्न होऊ नये राग, द्वेष मत्सर, दुजाभाव माझ्याजवळ कधीही येणार नाही, असे सुज्ञान प्रदान करा. महाराजांचे त्या काळात बावन्न राजे त्यांचे शिष्य होते. गुरु रविदासजी महाराजांना बावन्न राज्यांनी त्यांना गुरु मानले होते. त्वात हिंदू व मुसलमान राजे सुध्दा त्यांना आपले गुरू मानत.

प्राचीन काळापासून जगात अनेक धर्माचा उदय व अस्त झाला, कोणा एक जाती, धर्म, पंथ, समूहावर आक्रमण, बदला अथवा द्वेषाच्या भावनेतून निर्माण झालेल्या धर्माचा अस्त झाला आहे. तर जगाला सदैव प्रेम, शांती व विश्व मानव कल्याणाचा संदेश देणाऱ्या महान विभूतींचे विचार मात्र आधुनिक काळातही प्रेरणादायी ठरत असल्याचे जगतगुरु संत रविदास महाराज यांच्या रविदासिया धर्माचे जगभरातील वाढल्या अनुयायांमुळे सिद्ध होत आहे. वाराणसी येथे लाखो समुदायासमोर ३० जानेवारी २०१० रोजी सतपुरुष वांच्या उपस्थितीत गद्दीवर विराजमान झालेले संत श्री १००८ निरंजन दासजी यांच्या उपस्थितीत रविदासीया धर्माची स्थापना करण्यात आली. सतगुरू रविदासजी महाराजांचे जगभरात १३ कोटीहून अधिक अनुयायी असून, १५० हून अधिक देशात महाराजांची मंदिरे आहेत.

जगद्गुरू सत्‌गुरू रविदासजी महाराज यांचे जन्मस्थान असलेले श्री गोवर्धनपूर बाराणसी येथे रविदासीया या धर्माची स्थापना करण्यात आली. त्यावेळी संत श्री १०८ निरंजनदास महाराज व त्यांच्या सोबत शहीद संत श्री १०८ रामानंदजी महाराज या दोन संत महापुरुषांनी जगातील १५० देशात जाऊन जगद्गुरु सतगुरु रविदासजी महाराज यांची मानव कल्याणासाठीची अमृतवाणी व रविदासीया धर्माचा धर्मप्रसार केला.

देशभरात आजही अनेक संत व महापुरुष रविदासीवा या धर्माचा प्रचार व प्रसार करीत आहेत. सतगुरु रविदासजी महाराज यांचे जन्मस्थान असलेले श्री गोवर्धनपूर बाराणसी येथे रविदासीया या धर्माची स्थापना करण्यात आली. यावेळी सतगुरु श्री १०८ निरंजनदासजी महाराज व त्यांच्यासोबत शहीदसंत श्री १०८ रामानंदजी महाराज या दोन संत महापुरुषांनी जगातील दोनशे देशात जाऊन जगद्गुरु सतगुरु रविदासजी महाराज यांची मानव कल्याणासाठीची अमृतवाणी व रविदासीया धर्माचा धर्मप्रसार केला. देशभरात आजही अनेक संत व महापुरुष रविदासीया या धर्माचा प्रचार व प्रसार करीत आहेत.

मानव कल्याण हाच गुरु रविदासीया आहे. त्याच धरतीवर या धर्माची स्थापना प्रचार व प्रसार सुरू आहे. संत रविदास महाराज यांचा जन्म उत्तरप्रदेशातील श्रीगोवर्धनपूर, काशी बनारस येथे १३७७ इ.स भाय १४३३ संवत विक्रमी माघ शुक्ल, पोर्णिमेला झाला. श्रीमती कर्मा उर्फ कलसादेवी संतोखदासजी उर्फ रघु (रायच) हे त्यांचे माता-पिता होत. संत रविदास महाराज यांना विविध प्रदेशांमध्ये बोली भाषा संस्कृती भिन्नतेमुळे वेगवेगळ्या नावाने उच्चारले/ओळखले जाते. पंजाब व हरीयाणामध्ये गुरु रविदासजी, बंगालमध्ये रैइदास वा रोइदास, गुजरातमध्ये रोहीदास, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश व राजस्थानात रैदास, बिकानेर (राजस्थान) रइदास या नावाने ओळखल्या व मानल्या जाते.

सतगुरु रविदास महाराज म्हणतात, बेगमपुरा नगरी सर्व बंधनातून मुक्त असून येथे राहणाऱ्यात परस्परांमध्ये स्नेहाचे मित्रत्वाचे नाते आहे. येथे जात-पात, स्पृश्य-अस्पृश्य, गुलामी या कुप्रयारहित जीवन आहे. या रचनेद्वारे गुरु रविदासजी महाराजांनी विश्वाला मानव कल्याणाचा संदेश देऊन विश्वव्यापी समतेचा सिद्धांत दिला. संत रविदासजी महाराजांच्या मानव कल्याणाच्या विचारांवर आधारीत अद्भूत, आधुनिक, शांतीचा संदेश देणाऱ्या अनुपम अशा रविदासिया धर्माची स्थापना गुरु रविदास महाराज यांच्या ६३३ व्या जयंतीदिनी दि. ३० जानेवारी २०१० रोजी डेरा संत सरवणदासजी सचखंड बड़ाचे प्रमुख श्री १०८ संत निरंजनदासजी महाराज यांनी गुरु रविदासजी यांचे जन्मस्थळ श्रीगोवर्धन काशी येथे स्थापना केली. आधुनिक काळातील रविदासिया धर्माच्या माध्यमातून गुरु महाराजांच्या उच्चनीच भेद विरहित समाजाची संकल्पना रविदास व विश्व मानव कल्याणाचा सिद्धांत व शिकवणीचा प्रचार, प्रसार करण्यात येत आहे. संत रविदासजी महाराजांच्या विचाराने प्रभावित होऊन जगभरातील लोक रविदासिया धर्माचा स्वीकार मोठ्या प्रमाणात करीत आहेत.

जब सभ करि दोउ हात पग
दोउ नैन दोउ कान।।
रविदासत पृथक कैसे भये
हिंदू-मुसलमान ।।

गुरु रविदासजी म्हणतात की, शरीर सारखेच असलेले हिंदू-मुसलमान वेगळे असू शकत नाहीत. कारण दोघांनाही दोन हात, दोन पाय, दोन डोळे, दोन कान तर मग ते दोघे एक दुसऱ्यापासून वेगळे कसे असू शकतील. वास्तवात हिंदू-मुसलमान यांच्यात भेदभाव करू नये.

ज्यों केलन में पात ।।
रविदास न मानुष जुड सके,
जी ली जात ना जात ।।

गुरु रविदास महाराज म्हणतात की, केळीच्या झाडासारखी जाती व्यवस्था आहे. जशी केळीच्या झाडात पानानंतर पान नंतर पुन्हा पान आणि शेवटपर्यंत पानच पान तशीच समाजामध्ये जातीची आहे. ज्यात जाती नंतर जात त्यानंतरही जात अशा प्रकारे शेवटपर्यंत जातीचे दर्शन होत राहते. या जाती व्यवस्थेमुळेच समाजामध्ये बंधुभाव निर्माण होत नाही, म्हणूनच जाती व्यवस्था नष्ट झाली पाहिजे. ऊच ते ऊच नाम देओ समदरसी रविदास ठाकर बणि आई ।।

पराधीनता पाप है, जान लेहु रे
मीत ।। रविदास दास पराधीन से,
कौन करे है प्रीत ।।
पराधीनता पाप है,
जान लेहु रे मीत ।।
रविदास दास पराधीन से,
कौन करे है प्रीत ।।
माधो अबिदिआ हित कीन।
बिबेक दीप मलीन ।।
प्रभु जी तुम मोती हम धागा,
जैसे सोने मिलत सुहागा प्रभु जी तुम
स्वामी हम दासा, ऐसी भक्ति करे रैदासा ।।

**-बालाजी रविदास दुधंबे (रविदासीया)**
महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष, अ. भा. रविदासीया, धर्म संघटन महाराष्ट्र

# माझ्या स्मरणातील आजोबा : ईश्वरबापू



महाराष्ट्रातील खेड्या पाड्यात भटकंती करीत स्वच्छता आणि अंधश्रद्धा निमुलनाचा संदेश देणाऱ्या राष्ट्रसंत गाडगेबाबांच्या सहवासाने आपले जीवन अत्यंत निर्मळ भावनेने जगणारे माझे आजोबा ईश्वरबापू आयनेले यांचा जन्म कर्नाटक राज्यातील महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या सिमा प्रांतात खतगाव पट्टा हंगरगा (बु.) ता. औराद जि. बिदर येथे झाला. ईश्वर बापू म्हणून ओळखणारे माझे आजोबा ईश्वर काळबा आयनेले प्रामाणिक व एक निष्ठेने काम करणारे व्यक्ती म्हणून गावासह परिसरात ओळखले जात असत. त्या काळी संतगाडगेबाबा पाच गावाच्या सिमेवर असलेल्या मदनेश्वर (मष्टनेर) गावी कीर्तनातून त्यांनी प्राणी मात्रावर दया करा, निष्पाप प्राण्यांना बळी देऊ नका, नवस करू नका, आई-वडील आणि वडीलधाऱ्या मंडळीची सेवा करा, खोटे बोलू नका, कर्ज काढून सण साजरे करू नका असा संदेश दिला.

संत गाडगेबाबाच्या कीर्तनाचा ईश्वर बापू आयनेले यांनी लाभ घेवून स्वतःचे जीवनसुद्धा गाडगेबाबाच्या सेवेला अर्पण करून त्यांची शिकवण प्रत्यक्ष त्यांनी आचरणात आणून भुकेल्यांना अन्न, वस्त्रहीनांना वस्त्र देऊन नम्रतेने कुटुंबातील सर्वजण एकत्र मिळून राहा असे ते नेहमीच आम्हाला सांगत असत त्यांनी त्यांच्या हयातीत उद्धट वागणाऱ्याला कधीच वाईट वागणूक दिली नाही, मला कोणी जर शिव्या देऊन, मारून त्यांचें चांगले होत असेल तर ते त्यांनी जरूर करावे असेच ते नेहमी इतरांना सांगत असत म्हणून ते शेवटपर्यंत अजातशत्रूच राहिले. अत्यंत साधी राहणी, माणुसकीचा विचार जपणारे माझे आजोबा ईश्वर बापू यांचा सहवास मला लाभल्यामुळे मी स्वतःला भाग्यवान समजतो.

वयाच्या १११ व्या वर्षी त्यांचा अधून मधून तोल जाऊ लागला, हृदयाची ठोके ही वाढली, त्यातच त्यांचा रविवार दि. १ फेब्रुवारी २०१५ रोजी मी व माझ्या कुटुंबातील सर्व सदस्यांच्या साक्षीने त्यांनी शेवटचा निरोप घेऊन हे जग सोडून गेले. स्व.ईश्वर बापू यांच्या प्रेरणा आजही आमच्या सोबत आहेत. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास शांती देवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना

**-प्रल्हाद आयनेले,**
नांदेड
मो. ९८९०६१६३०१

## थोडक्यात...

### डॉ. दीपक पवार यांचे आज पीपल्स कॉलेजमध्ये व्याख्यान

**नांदेड (प्रतिनिधी)–** पीपल्स कॉलेजमधील पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभागाच्यावतीने डॉ. ना. य. डोळे स्मृती व्याख्यानमाले अंतर्गत डॉ. दीपक पवार यांचे भारतीय लोकशाही पुढील आव्हाने या विषयावर सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी व्याख्यान आयोजित केले आहे. हे व्याख्यान नरहर कुरुंदकर सभागृहात सकाळी १०.३० वा. होईल. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. व्यंकटेश काब्दे हे राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव प्रा. सौ. शामल पत्की या उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, संशोधक विद्यार्थी व नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. जी. भानेगावकर आणि विभाग प्रमुख तथा उपप्राचार्य प्रा. डॉ. अशोक सिद्धेवाड यांनी केले आहे.

### गुरु रविदास साहित्य संमेलनाच्या पूर्वतयारीची नांदेड येथे बैठक संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** आठवे अखिल भारतीय गुरु रविदास साहित्य संमेलन पूर्वतयारीची बैठक शनिवार दि. ३१ जानेवारी २०२६ रोजी राधाई अर्बन बँकेच्या शेजारील सभागृह, सतपाल प्लाजा, शेतकरी पुतळ्याजवळ, तरोडा नाका नांदेड येथे पार पडली.

येत्या रविवार, दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी आठवे अखिल भारतीय गुरु रविदास साहित्य संमेलन शिवपार्वती मंगल कार्यालय, भावसार चौक नांदेड येथे आयोजित करण्यात आले असून हे साहित्य संमेलन यशस्वी करण्यासाठी विविध समित्यांची निवड शनिवारच्या बैठकीत करण्यात आली असून, संमेलनाची जय्यत तयारी आहे.

# नांदेडमध्ये स्व. अजितदादांना सर्व पक्षीय श्रद्धांजली



**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अकाली निधन झाले. त्यांना सर्व पक्षीय मान्यवर व पदाधिकाऱ्यांकडून शनिवार, दि. ३१ जानेवारी रोजी कै. शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात श्रद्धांजली वाहण्यात आली.

या शोकसभेस सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, पदाधिकारी, पत्रकार व स्व. अजित दादांवर प्रेम करणाऱ्या जनतेने उपस्थित रहावे, असे आवाहन सर्व पक्षीय शहर जिल्हाध्यक्षांनी संयुक्तरित्या केले होते.

या शोकसभेत माजी मंत्री कमलकिशोर कदम, माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी मंत्री डॉ. माधवराव पाटील किन्हाळकर, नांदेडचे खासदार रवींद्र चव्हाण, नांदेड दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर, हदगावचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा, माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, आंबेडकरी चळवळीचे नेते सुरेश गायकवाड, प्रा. यशपाल भिंगे, प्रवीण पाटील चिखलीकर, ठाकरे शिवसेनेचे जिल्हाप्रमुख बबनराव बारसे, भाजपचे प्रवीण साले, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश पावडे, माजी महापौर अब्दुल सत्तार, व्यापारी हर्षद शहा, वंचित आघाडीचे फारूख अहमद, शेतकरी संघटनेचे गुणवंत पाटील हंगरगेकर, माजी महापौर जयश्री पावडे, प्रशांत इंगोले, मराठा सेवा संघाचे श्याम पाटील वडजे, छावा संघटनेच्या वतीने दशरथ पाटील कपाटे, शिवसेनेच्या माजी नगरसेविका अपर्णा नेरलकर यांच्यासह पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप आदी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वात शेवटी श्रद्धांजली वाहताना माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते कमलकिशोर कदम भावूक झाले होते.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाश घाटे माजी आमदार सुभाष साबणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावनगावकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्याध्यक्ष माधव पावडे, भारतीय जनता पार्टीचे महानगर उपाध्यक्ष दत्ता पाटील कोकाटे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पार्टी प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ग्रामीण उत्तर जिल्हाध्यक्ष स्वप्नील इंगळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष मोहसीनखान पठाण, ठाकरे शिवसेनेचे महानगरप्रमुख प्रकाश मारावार, उपजिल्हाप्रमुख राम चव्हाण, भगवानराव पाटील आलेगावकर, अशोक उमरेकर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विनय गिरडे पाटील नगरसेविका कविता मुळे, शांभवी साले, नागनाथ घिसेवाड, दिलीप कंदकुर्ते, एकनाथ मामडे, लक्ष्मण ठक्करवार, व्यंकटराव पाटील गोजेगावकर, डॉ. पी. डी. जोशी पाटोदेकर, आनंद चव्हाण, डॉ. विठ्ठल पावडे, सतीश देशमुख, निलेश पावडे यांच्यासह विविध पक्षांच्या पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते.

# किवळा येथील कुस्ती दंगलमध्ये अनेक नामवंत पहेलवानांचा सहभाग, शेवटची कुस्ती बरोबरीत

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील किवळा येथील हजरत शाहुसेन मस्तान साहेब दर्गा ऊरस शरीफमध्ये कुस्तींच्या दंगलींचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात महाराष्ट्रातील नामवंत पहेलवानांनी उपस्थिती लावली होती.

या कुस्तींच्या दंगलीतील शेवटची लढत किवळा येथील अच्युत टरके व नकुल दिल्ली यांच्यात चुरशीची लढत झाली. मात्र दोन्ही पहेलवानांनी वेगवेगळ्या डावपेच आखूनही लढत बरोबरीत काढण्यात आली. यावेळी हलगीच्या तालावर उपस्थितांनी जल्लोष केला.

या मानाच्या कुस्तीच्या प्रारंभी राष्ट्रवादी काँग्रेसचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. तसेच या कुस्ती सामन्यांचे उद्घाटन रुद्रहीन महाराज यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी माजी सभापती शंकर पाटील ढगे, साईनाथ टरके पाटील यांच्यासह अनेक मान्यवर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



दरवर्षीप्रमाणे यावर्षीही हजरत शहा हुसेन मस्तान साहेब दर्गा किवळा यांच्यावतीने ३१ जानेवारी रोजी या कुस्तींच्या दंगलीचे आयोजन करण्यात आले होते. कुस्तींची दंगल रुद्रहीन गुरु दयाळगीर महाराज मठ, ग्रामपंचायत कार्यालय किवळा, तंटामुक्त समिती, सेवा सहकारी सोसायटी व समस्त गावकरी मंडळी किवळाच्या वतीने आयोजित करण्यात आली होती.

यावेळी महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील व तालुक्यातील नामवंत पहेलवानांनी सहभाग नोंदविला. पंच म्हणून निरंजन टरके, जगनाथ टरके, राजू टरके, वैभव जाधव, नामदेव मोकले, पंजाब टरके, निरंजन टरके, प्रभाकर टरके यांनी काम पाहिले, तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच व्यंकट पाटील टरके, माजी सरपंच माधवराव पाटील टरके, अशोक पाटील टरके, रामजी पाटील ढगे, प्रल्हाद पाटील टरके, बालाजी पाटील टरके, गोविंदराव टरके, अजगर पठाण, तुकाराम पाटील कराळे, पंडित बारुळे, विठ्ठलराव किवळेकर, ग्रामपंचायत सदस्य विठ्ठलराव किवळेकर, शाम अंभोरे, आनंदा गायकवाड, तंटामुक्त अध्यक्ष व्यंकटी टरके, रविकिरण डोईफोडे, ग्रामविकास अधिकारी विशाल वडजे यांच्यासह मान्यवर व किवळा गावातील गावकऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रातोळी येथील श्री रोकडेश्वर महाराज यात्रा महोत्सवाला आजपासून प्रारंभ

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)–** नायगाव तालुक्यातील रातोळी येथील ग्रामदैवत श्री रोकडेश्वर महाराज यांच्या वार्षिक यात्रा महोत्सवाला रविवार, दि. १ फेब्रुवारीपासून भक्तिभावपूर्ण वातावरणात प्रारंभ होत आहे. यात्रेनिमित्त गावात उत्साहाचे व भक्तीचे वातावरण निर्माण झाले असून, ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणावर तयारी केली आहे.



यात्रेच्या पहिल्या दिवशी पहाटे श्रींचा अभिषेक व विधीवत पूजा संपन्न होणार असून, सकाळी ९ वाजता पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे. रात्री १२ वाजता नयनरम्य आतीषबाजी होणार असून, भाविकांसाठी ती विशेष आकर्षण ठरणार आहे.

सोमवार, दि. २ फेब्रुवारी रोजी भक्तांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, दुपारी २ वाजता कुस्त्यांची दंगल रंगणार आहे. या कुस्ती दंगलीतील अखेरच्या मानाच्या कुस्तीसाठी ११,१११ रुपये बक्षीस ठेवण्यात आल्याची माहिती यात्रा समितीने दिली आहे.

मंगळवार, दि. ३ फेब्रुवारी रोजी लोककला व लावणी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, या कार्यक्रमातून पारंपरिक लोकसंस्कृतीचा मनमुराद आनंद भाविकांना घेता येणार आहे.

या सर्व धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचा तालुका व परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन शिवराज पाटील, विश्वंभर पाटील, नंदू पाटील, विजय पाटील, राहुल पाटील, शिवाजी पाटील, गजानन पाटील, बालाजी पाटील, संदीप पाटील, विलास मावलगे, टी. जी. रातोळीकर, बी. जी. रातोळीकर यांच्यासह सर्व ग्रामस्थ व यात्रा समितीने केले आहे.

# वासरी, शंखतीर्थ वाळू घाटावर महसूल व पोलिसांची धाड; जिलेटिनच्या साह्याने बोटी उद्ध्वस्त, ९५ लाखांचे साहित्य नष्ट

**मुदखेड (प्रतिनिधी)–** मुदखेड तालुक्यातील महसूल व पोलीस प्रशासनामार्फत शनिवारी सकाळी वासरी, शंखतीर्थ व टाकळी परिसरातील गोदावरी नदीपात्रात चार फायबर बोट, तीन लहान बोट जिलेटीनच्या सहाय्याने उद्ध्वस्त करण्यात आल्या. ज्यात ९५ लाख ३० हजार रुपयांचे साहित्य नष्ट करण्यात आले आहे. या कारवाईत २ थरमाकॉलचे तराफे तसेच अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या एका वाहनाला पोलिसांनी जप्त केले आहे. यामध्ये जवळपास रु.९५,३०,००० लाखांचे नुकसान झाले आहे.

शनिवारी सकाळी ६ वाजता मातासाब गुरूद्वारा, मुगट परिसरात तहसील कार्यालयामार्फत गोदावरी नदीपात्रात बोट टाकण्यात आली. त्यामध्ये वासरी व शंखतीर्थ येथील गोदावरी नदीपात्रामध्ये अवैध रेती उपसा करणाऱ्या तीन मोठ्या फायबर बोट व तीन छोट्या बोट आढळून



आल्या. सदर पकडण्यात आलेल्या बोटी ह्या जिलेटीनच्या सहाय्याने नदीपात्रातच उडविण्यात आल्या. यामध्ये तीन फायबर बोट ज्यांची अंदाजीत किंमत रु. ६० लक्ष व तीन छोट्या बोट अंदाजीत किंमत रु.१५ लक्ष, वाळू साठवणुकीसाठी असलेले थरमाकॉलचे दोन तराफे ज्यांची किंमत अंदाजीत रु.३०/- हजार असे साहित्य जिलेटीनच्या सहाय्याने उडविण्यात आले. तसेच एक वाहन ज्याचा क्रमांक एमएच-२६ /बीई-५५०१ तो अवैध रेतीची वाहतूक करताना मुगट ते ब्राम्हणवाडा रस्त्यावर आढळून आला. त्याससुध्दा पुढील दंडात्मक कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन मुदखेड येथे लावण्यात आले. सदरची कारवाई केल्यानंतर टाकळी येथील गोदावरी नदी पात्रामध्ये एक फायबर बोट रेतीचा अवैध उपसा करताना आढळून आल्याने ती सुध्दा जिलेटीनच्या सहाय्याने उडविण्यात आली. शनिवारी केलेल्या कारवाईमध्ये एकूण रु.९५,३०,००० एवढ्या मुद्देमालाचे नुकसान झाले आहे.

सदरची कार्यवाही ही जिल्हाधिकारी राहुल कर्डीले, प्रवीण मेंगशेट्टी, उपविभागीय अधिकारी भोकर यांचे मार्गदर्शनाखाली आनंद देऊळगावकर, तहसीलदार मुदखेड, मारोतराव जगताप, नायब तहसीलदार संतोष कामठेकर, नायब तहसीलदार विजयकुमार पाटे, नायब तहसीलदार शाम चौधरी, सहा. महसूल अधिकारी श्रीमती अंजली बार्शिकर, मंडळ अधिकारी गोपाल माने, विश्वनाथ बोधमवाड, राजू चव्हाण, राजकुमार मस्के, बाबुराव मुळेकर, मनोज वाघमारे, संताजी देवापूरकर, प्रसाद पांडे, श्रीमती सविता कल्याणकर, श्रीमती रंजना दमकोंडवार, सर्व ग्राम महसूल अधिकारी तसेच पोलीस विभागातील बी. आर. कांबळे, सहा.पोलीस निरीक्षक एस. एस. शिंदे, पोलीस उपनिरीक्षक अंगद कदम, पोहेकॉ महेश कवठेकर, पो. हे.कॉ. राठोड, पो.हे.कॉ. साखरे, पो. हे.कॉ. देशमुख, पो.हे.कॉ. आडे, पो.हे.कॉ. पुणेबाईनवाड, पो.हे.कॉ. कैलास भांगे, सुल्तान पठाण महसूल सेवक व भावेश्वर मुंगल यांनी कारवाई पूर्ण केली. सदर अवैध उत्खननाबाबत नायब तहसीलदार मारोतराव जगताप यांनी पोलीस स्टेशन मुदखेड येथे गुन्हा नोंदविला आहे.

# महाड चवदार तळे सत्याग्रह दिन 'राष्ट्रीय जलदिन' घोषित करण्याचा ठराव

**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक बौद्ध धम्म परिषद, बावरी नगर, दाभड नांदेड येथे नुकत्याच घेण्यात आलेल्या धम्म परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली २० मार्च १९२७ रोजी झालेल्या ऐतिहासिक महाड चवदार तळे सत्याग्रह दिनाला 'राष्ट्रीय जलदिन' म्हणून घोषित करण्यात यावे, असा महत्त्वपूर्ण ठराव एकमताने मंजूर करण्यात आला.

या परिषदेत बोलताना वक्त्यांनी सांगितले की, महाड चवदार तळे सत्याग्रह हा केवळ जलहक्काचा लढा नव्हता, तर तो सामाजिक समता, मानवी प्रतिष्ठा आणि मूलभूत अधिकारांचा ऐतिहासिक संघर्ष होता. त्यामुळे या दिवसाला राष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळणे आवश्यक आहे, असे मत व्यक्त करण्यात आले.

परिषदेत उपस्थित बौद्ध भिक्खू, सामाजिक कार्यकर्ते व विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी या ठरावाला पाठिंबा दिला. ठरावाची प्रत केंद्र सरकार व संबंधित मंत्रालयांना पाठविण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या उपक्रमामुळे देशभरात जलहक्क, सामाजिक न्याय व संविधानिक मूल्यांविषयी जनजागृती होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. या आंदोलनाचे प्रणेते महेंद्र पिंपळगावकर गेल्या काही वर्षांपासून ही मागणी सातत्याने राष्ट्रीय पातळीवर मांडत असून, त्याचा पाठपुरावा करत आहेत.

# पालकांनी मुलांना आपल्या आवडीनुसार करिअर करु द्यावे –सहाय्यक समाजकल्याण आयुक्त मिनगिरे

## लोह्यात विश्वकर्मा जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**लोहा (प्रतिनिधी) –**पालकांनी मुलांना आपल्या आवडीनुसार करिअर करू द्यावे, असे आवाहन सहाय्यक समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले. लोहा शहरात नुकतीच भगवान विश्वकर्मा जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मिनगिरे मार्गदर्शन करताना बोलत होते.

यावेळी भगवान विश्वकर्मा यांच्या प्रतिमेची मिरवणूक देऊळगल्ली येथून मुख्य रस्त्याने टाळ मृदंगाच्या गजरात काढण्यात आली. ही मिरवणूक हळदव रोड येथील भगवान विश्वकर्मा मंदिराच्या प्रांगणात विसर्जित करून कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार शिवाजी पांचाळ होते तर प्रमुख अतिथी



म्हणून नांदेडचे सहाय्यक समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगिरे, लोहा येथील म.रा. वि. महावितरणचे उपकार्यकारी अभियंता नामदेवराव सुतार, लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार, माजी जि. प. सदस्य संजय पाटील कराळे, भाजपा पंचायतराज आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष माधव पांचाळ, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष राम पाटील पवार, पांगरीचे माजी सरपंच सुदाम पाटील बुद्रुक, नगरसेवक हरीभाऊ चव्हाण, माजी नगरसेवक उत्तम महाबळे, माजी नगरसेवक चंद्रकांत नळगे, नगरसेवक प्र. राजू बोडके,जयंती मंडळाचे केशव पांचाळ, विनोद पांचाळ, रमेश पांचाळ कारागिर, बालाजी पांचाळ, रामवाडीचे पोलीस पाटील वैजनाथ पांचाळ रायवाडीकर, विठ्ठल सूर्यवंशी, देवानंद पांचाळ, साईनाथ पांचाळ, स्वप्नीव पांचाळ, विरेंद्र पांचाळ, दिलीप पांचाळ, संतोष पांचाळ, सुरेश पांचाळ, रामानंद रामेज्वार, माधव पांचाळ अंतेश्वरकर, हनमंत पांचाळ, भगवान पांचाळ, राम पांचाळ, विठ्ठल पांचाळ, सोपान पांचाळ, बाबुराव पोतदार, श्रीरंग पांचाळ, सुधीर अंबेकर यांच्यासह लोहा शहर व तालुक्यातील सकल विश्वकर्मा बांधव, महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पालकांनी आपल्या मुलांना आपल्या आवडीनुसार करिअर करु द्यावे, असे मार्गदर्शनपर भाषणात समाज कल्याण अधिकारी शिवानंद मिनगिरे यांनी म्हटले.

तसेच यावेळी प्रसिद्ध किर्तनकार हभप माणिकराव महाराज रेंगे जामकर यांनी आपल्या किर्तनातुन समाज प्रबोधन केले.

# आज संत शिरोमणी जगद्गुरू रवीदास महाराज सार्वजनिक जयंती महोत्सव

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय चर्मकार महासंघ जिल्हा शाखा नांदेडच्यावतीने संत शिरोमणी जगद्गुरू रवीदास महाराज सार्वजनिक जयंती महोत्सवाचे आयोजन रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड यांनी एका पत्रकानुसार कळविले आहे.

संत शिरोमणी जगद्गुरू रवीदास महाराज जयंती महोत्सवाच्या वतीने दि. १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय येथून शोभायात्रा काढण्यात येणार असून, यानिमित्ताने शक्तीनगर येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंतीच्या पूर्वतयारीसाठी जयंती महोत्सवाचे अध्यक्ष संजय सोनटक्के, महानगराध्यक्ष के. के. गंगासागरे, जिल्हाध्यक्ष संदीप गोरे, गजानन जोगदंड, युवा जिल्हाध्यक्ष रवीराज गंगासागरे, शहराध्यख विठ्ठल वाघमारे, मराठवाडा संघटक गोविंद माऊली पार्डीकर, राजेंद्र कांबळे, महासचिव रमेशचंद्र हराळे, विशाल बनसोडे, अमोल जोगदंड, कैलास सूर्यवंशी, बालाजी देशमाने, व्यंकटराव कांबळे, सुरेश शेळके, रणजित सूर्यवंशी, गणपत वाघमारे, संजय शेळके, मोहन आसोरे, मारोतराव हवेलीकर, मारोती हराळे, पांडुरंग गंगासागरे, सुभाष दुधंबे, सचिन दुधंबे, हरीष कांबळे, बालाजी गंगासागरे, केरबा कसारे यांच्यासह अनेकजण परिश्रम घेत आहेत.

# प्रजासत्ताक दिनी एसटी आगारात कामगार-कर्मचाऱ्यांचा सन्मान, बक्षीस वाटप



**नांदेड (प्रतिनिधी)–** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील नांदेड आगारात २६ जानेवारी रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन मोठ्या हर्षोल्हासात साजरा करण्यात आला.

यावेळी सर्वप्रथम विभागीय वाहतूक अधीक्षक तथा प्रभारी आगार व्यवस्थापक मिलिंदकुमार सोनाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्रध्वजास मानवंदना देण्यात आली. राष्ट्रगीतानंतर लगेचच भारतीय संविधानाच्या उद्दिशिकेचे (सरनामा) वाचन सामाजिक कार्यकर्ते गुणवंत एच. मिसलवाड यांनी करून सर्व कष्टकरी कामगार-कर्मचाऱ्यांना सामुहिकरित्या शपथ दिली.

यावेळी प्रजासत्ताक दिन, चालक दिन, राष्ट्रीय रोड सुरक्षा, इंधन बचत मासिक कार्यक्रमाचे औचित्य साधून रापम आगारातील कष्टकरी कामगार-कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावून सुरक्षित वाहन चालवून प्रवाशांना सुरक्षित सेवा देत इंधनबचत करून सेवा दिल्याबद्दल आगारातील चालक, वाहक, यांत्रिक कामगार-कर्मचाऱ्यांचा सुरक्षित सेवेचे पाच वर्षे, दहा वर्षे, पंधरा वर्षे, वीस वर्षे, पंचवीस वर्षे आणि त्यापुढे चालकांनी सुरक्षित सेवा दिल्याबद्दल २० चालकांचा व ई-बस एस-व्ही ट्रान्स प्रा.लि.चे ३ उत्कृष्ट चालकांचा सुरक्षित सेवेचे बॅच, बिल्ले देवून, प्रशस्तीपत्र, पुष्पगुच्छ देवून आगार व्यवस्थापक .मिलींदकुमार सोनाळे यांच्या हस्ते बक्षीस वाटप करून सन्मानीत करण्यात आले.

# हरडफ येथे आज ५३ वा धम्म मेळावा

**हदगाव (प्रतिनिधी)–** तालुक्यातील हरडफ येथे ५३ वा धम्म मेळावा रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे.

यावेळी प्रथम सत्रात सकाळी ९ वाजता धम्मकीर्ती महिला मंडळाच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येणार आहे. सकाळी साडेनऊ वाजता आर. व्ही. वाठोरे, गणपत वाठोरे धम्मदेसना देणार आहेत. दुपारी बारा वाजता तथागत गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांच्या तैलचित्राची गावातील प्रमुख रस्त्याने मिरवणूक काढण्यात येणार आहे. द्वितीय सत्रात सायंकाळी सात ते आठ या वेळेत ॲड. डी. एफ. हरदडकर, उद्योजक मारुती भगत, अहमदाबाद सामाजिक कार्यकर्त्या लताबाई मारुती मुनेश्वर यांची उपस्थिती राहणार सून, या धम्म मेळाव्याला उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पंजाबमधील महिला सरपंचांचा भोकर तालुक्यात अभ्यास दौरा

## भोकर तालुक्यातील स्मार्ट गाव नागापूर, हाडोळीसह इतर गावांना भेट

**भोकर (प्रतिनिधी)–** पंजाब राज्यातील नवनिर्वाचित महिला सरपंच नांदेड जिल्ह्यात अभ्यास दौऱ्यासाठी आल्या आहेत. या अभ्यास दौऱ्यात भोकर तालुक्यातील स्मार्ट गाव नागापूर, हाडोळी ग्रामपंचायतसह खरबी गावास भेट दिली आहे.

पंजाब राज्यातील पठाणकोट जिल्ह्यातून आलेल्या दीडशेपेक्षा जास्त महिला सरपंच व पदाधिकाऱ्यांच्या टीमने दिनांक ३१ जानेवारी २०२६ भोकर तालुक्यातील अनेक स्पर्धेत विविध स्तरावरील पुरस्कार प्राप्त स्मार्ट गाव नागापूर, हाडोळी या गावांसह खरबी, वाकद व पंचायत समिती कार्यालय भोकर या ठिकाणी ग्रामपंचायत, जि. प. शाळा, अंगणवाडी व स्मशानभूमीला भेटी देऊन ग्रामपंचायतच्या कामकाजाबाबत




सविस्तर अभ्यास केला. स्मार्ट गाव नागापूरच्या कामाबद्दल आनंद व्यक्त करून म्हणाले की, आमची पंजाबी भाषा आणि येथील मराठी भाषेबद्दल आम्हाला समस्या जाणवली असली तरीही गावातील पाणीपुरवठा, स्वच्छता कार्यालयातील अभिलेख दस्तावेज यासह या गावाने मालमत्ता कर वसूल करून गावाचा केलेला कौतुकास्पद विकास आम्हाला सर्व काही सांगून जाते हा विकास आमच्यासाठी खरोखरच प्रेरणादायी आहे, असे यावेळी पंजाबमधील नवनियुक्त सरपंचांकडून नागापूर गावाबद्दल गौरवोद्गार काढले.

भोकर तालुक्यातील पंचायत समिती व ग्रामपंचायतच्या माध्यमातून अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक व पदाधिकाऱ्यांनी केलेले काम आमच्यासाठी आदर्श आहे. येथील नियोजनबद्ध कार्यपद्धतीचा उपयोग आम्ही नक्कीच आमच्या राज्यातील गावांच्या विकासासाठी करू आणि महाराष्ट्र व पंजाब राज्यातील कामकाजाच्या पद्धतीची देवाण-घेवाण केली जाईल व पंजाब राज्यात या कामाचा अजेंडा तयार करण्याचा निर्धार पंजाब राज्यातील उपस्थित महिला सरपंच पदाधिकाऱ्यांनी केला.

यावेळी गटविकास अधिकारी माधव केंद्रे, विस्तार अधिकारी शेटवाड, यशदा प्रतिष्ठान पुणे पोलेसर, सहाय्यक कृषी अधिकारी काकडे, स्मार्ट गाव नागापूर ग्रामपंचायत सरपंच दत्ता व्यवहारे, नागापूर ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र काळे, हाडोळी ग्रामपंचायत सरपंच माधव अमृतवाड, हाडोळी ग्रामपंचायत अधिकारी अरविंद मुगने, खरबी ग्रामपंचायत सरपंच सिंधूबाई कल्याणकर, खरबी ग्रामपंचायत अधिकारी गणेश वानखेडे आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# चंदेरी

## अभिनव कश्यपला झटका!

### सलमानबद्दलच्या अपशब्दांवर न्यायालयाने घातली बंदी

सलमान खानला वारंवार शिवीगाळ करणाऱ्या दिग्दर्शक अभिनव कश्यपला न्यायालयाने झटका दिला आहे. सलमानने त्याच्या 'दबंग' चित्रपटाचे दिग्दर्शक अभिनव कश्यप आणि इतर दोघांविरुद्ध मानहानीचा खटला दाखल केला आहे. शुक्रवारी (३० जानेवारी) मुंबईतील एका न्यायालयाने कश्यपला सलमान किंवा त्याच्या कुटुंबाविरुद्ध कोणतीही बदनामीकारक टिप्पणी करण्यास किंवा प्रकाशित करण्यास तात्पुरती बंदी घातली आहे. सलमानने मानहानीच्या दाव्यात अशा बदनामीकारक विधानांविरुद्ध कायमस्वरुपी मनाई आदेश आणि ९ कोटी रुपये नुकसान भरपाईची मागणी केली आहे.

कश्यप व्यतिरिक्त खुशबू हजारे आणि इतर अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मनाही खटल्यात ओढले आहे. दाखल केलेल्या खटल्यानुसार, कश्यप यांनी सलमानच्या व्यावसायिक प्रामाणिकपणा आणि वैयक्तिक चारित्र्याला तसेच त्याच्या कुटुंबातील सदस्यांना लक्ष्य करून अपमानास्पद भाषा वापरली. एका मुलाखतीत सलमान खानच्या कुटुंबाला दोषी गुन्हेगार आणि 'जिहादी इकोसिस्टिमचे सदस्य असे संबोधले. सलमानचा चेहरा, वय आणि वैयक्तिक




आयुष्याबद्दल अपमानास्पद भाषाही वापरली. त्याची तुलना कुख्यात गुन्हेगारांशी केल्याचा आरोप आहे. सलमान खानने 'बिनशर्त' माफी मागावी, अशी मागणी केली आहे. भविष्यात कोणताही बदनामीकारक मजकूर किंवा मुलाखती प्रकाशित करण्यापासून कायमचा प्रतिबंध घालण्याची आणि सर्व वादग्रस्त सामग्री काढून टाकण्याची आणि बिनशर्त माफी मागण्याची मागणी या खटल्यात करण्यात आली आहे.

## उपासना सिंगने सांगितले, चित्रपटसृष्टीने कटू सत्य!

'द कपिल शर्मा शो'मध्ये बुआ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अभिनेत्री उपासना सिंगने मनोरंजन उद्योगाची काळजी बाजू आणि अडचणींबद्दल सांगितले. हा उद्योग ग्लॅमरने भरलेला दिसतो. मात्र संघर्ष, स्पर्धा आणि इतर अनेक गोष्टी लपवतो. लोकांना काळी बाजू दिसत नाही. सामान्य माणसाला वाटते की ते एक ग्लॅमरस जीवन आहे आणि कलाकार खूप आरामात जगतात, असे उपासना म्हणाली. उपासना म्हणाली, की 'जेव्हा मी CINTAA (Cine & TV Artistes Association) ची सरचिटणीस झाली, तेव्हा कलाकार त्यांच्या समस्या घेऊन माझ्याकडे येऊ लागले. काहींनी सांगितले की त्यांना महिन्यात फक्त चार किंवा पाच दिवसच काम मिळते. त्याचेही पैसे त्यांना ९० दिवसांनी, कधीकधी १२० दिवसांनी पैसे मिळतात. TDS कापतात, एजंट त्याचे कमिशन घेतो. मग कलाकाराला किती उरते? आणि हे मुंबईसारख्या शहरात आहे, जिथे भाडे खूप जास्त आहे. मला जाणवले की बरेच लोक



त्यांच्या आरोग्याची काळजीदेखील घेऊ शकत नाहीत. पैशांअभावी ते डॉक्टरकडे जाऊ शकत नाहीत.

### लोकांची अवस्था पाहून दु:ख

उपासना म्हणाली, की मला खूप वाईट वाटले. कारण मी एक अभिनेत्री आहे आणि देवाच्या कृपेने मी भाग्यवान आहे. मला चांगले काम मिळाले, मी मुख्य भूमिका साकारल्या. पण जेव्हा मी या लोकांची अवस्था पाहिली तेव्हा मला खूप वाईट वाटले. आता आम्ही सतत त्यांना मदत करण्याचा प्रयत्न करत आहोत.

### उपासना सिंग कोण आहे?

उपासना सिंगचे लग्न सुप्रसिद्ध अभिनेता नीरज भारद्वाजशी झाले आहे. ती जवळजवळ चार दशकांपासून मनोरंजन उद्योगाचा भाग आहे. चित्रपट आणि टेलिव्हिजनमध्ये तिची दीर्घ कारकीर्द आहे. तिने जुडवा, हलचल, हंगामा, गोलमाल रिटर्न्स सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. टेलिव्हिजनवर उपासना सिंगला कॉमेडी नाईट्स विथ कपिल आणि द कपिल शर्मा शोसारख्या शोद्वारे ओळख मिळाली, जिथे पिंकी बुवाची भूमिका अत्यंत लोकप्रिय झाली.

**अभिनेत्री राणी मुखर्जीची मुलाखत**

## खरे यश म्हणजे तुम्ही किती लोकांच्या हृदयाला स्पर्श केला...

### यश-कामगिरी म्हणजे जीवन प्रामाणिकपणे जगणे

**एक मुलगी जिच्या नशिबात अभिनेत्री होण्याचे नव्हते, पण नशिबाने तिला चित्रपटाच्या सेटवर आणले. नंतर, ती या स्टार्सच्या जगात इतकी चमकली की ती 'बॉलिवूडची राणी' बनली. आपण राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या राणी मुखर्जीबद्दल बोलत आहोत. या वर्षी इंडस्ट्रीमध्ये ३० वर्षे पूर्ण करणारी राणी तिच्या 'मर्दानी ३' चित्रपटामुळे चर्चेत आहे. ती पुन्हा एकदा टॉप पोलीस अधिकारी शिवानी शिवाजी रॉय म्हणून पडद्यावर परतली आहे. यावेळी, ती अचानक गायब होणाऱ्या मुलींना वाचवण्यासाठी परतली आहे. खऱ्या आयुष्यात एका प्रेमळ मुलीची आई असलेल्या राणीने विशेष मुलाखतीत चित्रपट, वैयक्तिक आयुष्य, करिअर आणि तिची मुलगी आदिराचे संगोपन याबद्दल भरभरून सांगितले. ती म्हणते, की मी एका मुलीची आई आहे. म्हणून मला भीती वाटते... गेल्या वर्षी शाहरुख खानसोबत राणी मुखर्जीला राष्ट्रीय फिल्म पुरस्कार मिळाला. आपल्या जवळच्या मित्रासोबत एकाच सोहळ्यात हा प्रतिष्ठीत पुरस्कार मिळवणे खूपच हृदयस्पर्शी क्षण होता, असे राणी सांगते...**



- **प्रश्न : तू राष्ट्रीय पुरस्कार जिंकलास आणि शाहरुख खान तुझ्यासोबत होता. तो क्षण कसा होता?**

» **राणी :** तो क्षण अविस्मरणीय होता. शाहरुख खूप चांगला कलाकार आहे. तो माझा वरिष्ठ आहे. त्याच्यासोबत एकाच व्यासपीठावर पुरस्कार मिळणे ही खूप मोठी गोष्ट आहे, कारण तो ३५ वर्षांपासून इंडस्ट्रीमध्ये आहे आणि मी ३० वर्षांपासून आहे. त्यानेही इतक्या वर्षांपासून कठोर परिश्रम केले आहेत. हा त्याचा पहिला राष्ट्रीय पुरस्कार होता आणि माझाही. शाहरुख आणि माझ्याबद्दलची सर्वात चांगली गोष्ट म्हणजे आम्हाला आनंद होता की लोक अजूनही आमच्यावर प्रेम करतात आणि आमच्या कामाची प्रशंसा करतात, म्हणून आमच्यासाठी कृतज्ञ राहण्याची ही एक संधी होती.

- **प्रश्न : अभिनेत्री बनू इच्छित नसलेली आणि चित्रपटसृष्टीत आल्यामुळे जिचे पालकही फारसे आनंदी नव्हते तिने या वर्षी चित्रपटसृष्टीत ३० वर्षे पूर्ण केली आहेत. भरपूर चित्रपट, पुरस्कार, कसा वाटतो तुला हा प्रवास?**

» **राणी :** मी अभिनय क्षेत्रात प्रवेश करणार असल्याचे कळल्यावर वडील नाराज झाले होते. आई मात्र खूप उत्साहित होती. आईमुळेच मी या जगात आले. मला अभिनेत्री व्हायचे नव्हते. योगायोगाने अभिनेत्री बनले. पण इंडस्ट्रीत प्रवेश केल्यानंतर मला या कामाची, या कलेची आवड झाली, म्हणून मला असे वाटते की मी अभिनेत्री होण्यासाठीच जन्माला आली. गेल्या तीस वर्षांत प्रेक्षकांकडून मला भरभरून प्रेम मिळाले. देवाने मला इथपर्यंत पोहोचवण्यात मोठी भूमिका बजावली आहे.

- **प्रश्न : गेल्या वर्षी 'मिसेस चॅटर्जी विरुद्ध नॉर्वे' चित्रपटातील उत्कृष्ट कामगिरीसाठी तुला पहिला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. जर तू आई नसतीस तर या चित्रपटातील भूमिकेला न्याय देऊ शकली असतीस का? आई असण्याचे श्रेय या पुरस्कारामागे किती आहे?**

» **राणी :** मी यापूर्वी आईची भूमिका केली आहे. मी 'तारा रम पम'मध्ये आईची भूमिका केली आहे. 'कुछ कुछ होता है'मध्ये आईची भूमिका केली आहे. म्हणून मला वाटते की जेव्हा तुम्ही स्त्री म्हणून जन्माला येता तेव्हा तुमच्या आत एक आई देखील जन्माला येते. मला वाटत नाही की मूल झाल्यानंतरच स्त्रीमध्ये ती मातृत्वाची भावना निर्माण होते. मोठी बहीण लहान बहीण किंवा भावाला आईसारखी जपत असते. स्त्री असणे ही एक मोठी गोष्ट आहे. जन्मापासूनच आपल्यात मातृत्वाची भावना रुजलेली असते. म्हणूनच, जेव्हा आपण बाहुल्यांसोबत खेळतो आणि घरे बांधतो तेव्हा ती भावना नेहमीच असते.

- **प्रश्न : स्त्री असण्याची सर्वात मोठी ताकद कोणती आणि कमकुवत बाजू कोणती?**

» **राणी :** कोणतीही महिला ज्या पद्धतीने प्रेम करते, त्यात ती सर्वस्व अर्पण करत असते. ती स्वतःच्या भावनांपेक्षा आपल्या आवडत्या व्यक्तीच्या भावना जपण्याला महत्त्व देते. हे महिलांचे सामर्थ्यही आहे आणि कमकुवतपणाही. मीदेखील अशीच आहे. पण मला असं वाटतं, की जोडीदाराची किंवा कुटुंबातील सदस्यांची काळजी घेण्याबरोबरच प्रत्येक महिलेने स्वतःचीही तितकीच काळजी घेतली पाहिजेत.

- **प्रश्न : इतकी प्रसिद्धी, प्रेम आणि पुरस्कार मिळवल्यानंतर सर्वात मोठी कामगिरी किंवा यश तुला कोणते वाटते?**

» **राणी :** माझ्यासाठी यश किंवा कामगिरी म्हणजे जीवन प्रामाणिकपणे जगणे. नाते प्रामाणिकपणे जपणे. आयुष्याचा खरा आनंद म्हणजे तुमचे कुटुंब आणि मित्र तुमच्या सुख-दुःखात तुमच्यासोबत आहेत हे जाणून घेणे. उदाहरणार्थ, धरमजींचे निधन झाले, तेव्हा आपल्याला काय आठवते? त्यांचे काम, ते कोणत्या प्रकारचे व्यक्ती होते, त्यांनी इतरांना दिलेले प्रेम... आपण त्यांच्या बंगल्याबद्दल किंवा त्यांच्याकडे किती गाड्या होत्या याबद्दल बोलत नाही. त्यांनी लोकांना अपार प्रेम कसे दिले आणि त्यांना प्रेरणा कशी दिली हे आपल्याला आठवते. त्यांनी त्यांच्या कामातून किती जीवनांना स्पर्श केला ते आपल्या आठवणीत राहते. खरे यश म्हणजे तुम्ही किती लोकांच्या हृदयाला स्पर्श केला...



- **प्रश्न : कारकिर्दीच्या सुरुवातीला आवाजामुळे तुला टीकेचा सामना करावा लागला होता. तू त्या गोष्टी कशा हाताळल्या होत्या?**

» **राणी :** खरं तर चिनी कॅलेंडरमध्ये माझी रास घोडा आहे. म्हणून मी अशी आहे. मी पुढे पाहते. आजूबाजूला पाहत नाही. इतर काय म्हणत आहेत किंवा विचार करत आहेत याची काळजी करण्यात मी वेळ वाया घालवत नाही. मी जे करायचे आहे ते करते आणि तोच विचार माझ्या कामी आला.

- **प्रश्न : तू एक्स आणि इंस्टाग्रामसारख्या सोशल मीडियापासून दूर का राहते? तुला मोहात पाडत नाहीत का त्या गोष्टी?**

» **राणी :** नाही. माझे खूप नातेसंबंध आहेत. मी एक मुलगी, एक पत्नी, एक आई, एक मित्र आणि एक अभिनेता आहे. मला अनेक भूमिका निभवाव्या लागतात. एवढ्या गोष्टी असताना सोशल मीडियाची जबाबदारी मी स्वतःवर का टाकावी? ती देखील एक जबाबदारी बनेल. म्हणून मी ते टाळते.

- **प्रश्न : 'मर्दानी २'ची कथा बलात्काराच्या प्रकरणाबद्दल होती. आता 'मर्दानी ३'मध्ये तू महिलांच्या तस्करीसारख्या गंभीर सामाजिक धोक्यावर प्रकाश टाकला आहेस. असे चित्रपट बनवण्याचा तुझ्यावर कसा परिणाम होतो? या समस्या तुला त्रास देतात का?**

» **राणी :** हो मला या सर्व गोष्टी त्रास देतात. कारण या गोष्टी समाजात घडत आहेत. बऱ्याचदा, आपण विचार करतो, 'अरे, अशा त्रासदायक गोष्टी आपण टाळल्या पाहिजेत. कारण त्या आपल्याला अस्वस्थ करतात. पण अशा गोष्टींबद्दल अस्वस्थ असणे महत्वाचे आहे. आपल्याला त्रासदायक गोष्टी पाहण्याची आवश्यकता आहे. कारण त्यामुळे जागरूकता येईल. मी लोकांना हे घडत आहे हे कळवण्यासाठी या कथा सांगते. हे आपल्या रस्त्याच्या कोपऱ्यावर, आपल्या परिसरात घडत आहे, म्हणून जागे व्हा. आपण फक्त आपल्या आरामदायी खोल्यांमध्ये राहू शकत नाही. या काळात, आपण सर्वकाही तोंड देण्यासाठी तयार असले पाहिजे. आपण जागरूक राहिले पाहिजे. आपण आपल्या मुलांबद्दल विचार केला पाहिजे.

- **प्रश्न : तू स्वतः एका मुलीची आई आहेस... तुम्हाला या गोष्टी ऐकून आणि वाचून भीती वाटते का?**

» **राणी :** हो, मला नक्कीच भीती वाटते. माझी मुलगी मोठी होत असताना, तिला शाळेत जितका वेळ घालवता येतो तितका वेळ आपल्याला तिच्यासोबत दररोज घालवता येत नाही, म्हणून मला सतत भीती वाटते.

- **प्रश्न : इंडस्ट्रीमध्ये, मैत्री अनेकदा स्वार्थी कारणांसाठी केली जाते. आमिर खान, शाहरुख खान आणि सलमान खान यांच्याशी तुझी मैत्री अबाधित आहे. त्याबद्दल काय सांगशील?**

» **राणी :** बघा आमची मैत्री कोणत्याही स्वार्थी कारणांसाठी नव्हती म्हणून ती दीर्घकाळ टिकली. मला कधी कोणताही लोभ नव्हता. आमची मैत्री अशी नव्हती काम असतानाही होती आणि नसतानाही कायम होती. मी नातेसंबंधांना महत्त्व दिले. हो, जेव्हा आम्ही काम करत होतो, तेव्हा आम्ही खूप मेहनत करत होतो. जेव्हा आमचे नाते होते, तेव्हा आम्ही ते टिकवून ठेवले. म्हणूनच आम्ही आजही मित्र आहोत.

## एका नाण्याने बदलले प्रीती झिंटाचे आयुष्य...

**बॉलीवूड अभिनेत्री प्रीती झिंटा डिंपल्स आणि स्पष्टवक्त्या शैलीमुळे ओळखली जाते. तिचा चित्रपट प्रवास कोणत्याही नियोजनाने किंवा भव्य स्वप्नांनी सुरू झाला नाही, तर एका छोट्या निर्णयाने सुरू झाला. असे म्हटले जाते की एका नाण्याने तिच्या आयुष्याचा भविष्यकाळ ठरवला...**

आज जरी ती चित्रपटांपासून दूर असली तरी तिचा प्रवास, संघर्ष अजूनही लोकांच्या आठवणींत आहे. प्रीती झिंटाचा जन्म ३१ जानेवारी १९७५ रोजी हिमाचल प्रदेशातील शिमला येथे झाला. तिचे वडील दुर्गानंद झिंटा भारतीय सैन्यात अधिकारी होते. तिची आई नीलप्रभा गृहिणी होती. प्रीती १३ वर्षांची असताना तिच्या वडिलांचा एका रस्ते अपघातात मृत्यू झाला. तिची आईही या अपघातात गंभीर जखमी झाली होती. तिला बरे होण्यासाठी जवळजवळ दोन वर्षे लागली. इतक्या लहान वयात वडिलांना गमावल्याने प्रीतीचे आयुष्य पूर्णपणे बदलले.

प्रीतीने एका मुलाखतीत खुलासा केला, की तिने कोणतेही मोठे स्वप्न किंवा योजना घेऊन चित्रपटांमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला नव्हता. चित्रपट निर्माते शेखर कपूर मला तारा रम पम पम चित्रपटासाठी साइन करू इच्छित होते. मला छान दिसायचे होते... मग मी म्हणाले, की जर माझ्या नशिबात हेच असेल तर मी एक नाणे टाकून पाहेन. जर हेड्स आले तर चित्रपटांमध्ये करिअर करेन आणि जर ते टेल्स पडले तर मी करणार नाही... हेड्स पडले अन् त्याच क्षणी प्रीतीने अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय तिच्या नशिबात एक महत्त्वाचा टप्पा ठरला.



### टॉप अभिनेत्री बनली

१९९८ मध्ये तिने शाहरुख खानच्या दिल से या चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. चित्रपटातील तिची भूमिका लहान असली तरी, तिची निरागसता आणि पडद्यावरची उपस्थिती प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होती. त्यानंतरच्या सोल्जर, क्या कहना, संघर्ष, दिल चाहता है, कल हो ना हो, वीर-जारा, सलाम नमस्ते आणि कभी अलविदा ना कहना या चित्रपटांनी तिला इंडस्ट्रीतील टॉप अभिनेत्री बनवले.



### गुन्हेगारी मानसशास्त्रात पदव्युत्तर

प्रीती नेहमीच तिच्या अभ्यासात उत्कृष्ट राहिली. तिने शिमला येथे शिक्षण घेतले आणि नंतर इंग्रजी ऑनर्स पदवी प्राप्त केली. तिने गुन्हेगारी मानसशास्त्रात पदव्युत्तर शिक्षणदेखील घेतले.

### अभिनयाचे कौतुक

प्रीतीला तिच्या दमदार अभिनयासाठी अनेक पुरस्कार मिळाले. कल हो ना हो... साठी तिला फिल्मफेअर पुरस्कार मिळाला, तर वीर-झारा आणि इतर चित्रपटांमधील तिच्या अभिनयाचेही खूप कौतुक झाले.

### जीन गुडइनफशी लग्न

प्रीतीच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल बोलायचे झाले तर, तिने २०१६ मध्ये अमेरिकन उद्योगपती जीन गुडइनफशी लग्न केले आणि आता ती तिच्या पती आणि जुळ्या मुलांसह अमेरिकेत आनंदाने राहते.

# मी सुनेत्रा अजित पवार शपथ घेते की...; महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्र्यांनी घेतली शपथ, अत्यंत साधेपणाने पार पडला सोहळा

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत निधन झाल्यानंतर राज्यासह देशभरातून शोक व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महत्त्वाचा निर्णय घेत अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड केली आहे. त्यानंतर त्यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली आहे. मोजक्या नेत्यांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने हा शपथविधी सोहळा लोकभवनातील दरबार हॉलमध्ये पार पडला. राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सुनेत्रा पवार यांना मंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. या कार्यक्रमासाठी राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव आणि राजशिष्टाचार अधिकारी उपस्थित होते.

सुनेत्रा पवार या शुक्रवारी रात्रीच बारामतीतून मुंबईकडे रवाना झाल्या होत्या. आज सकाळपासून मुंबईत राजकीय घडामोडींना वेग आल्याचे पाहायला मिळाले होते. सुनेत्रा पवारयांची विधिमंडळ



पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. राष्ट्रवादीची गटनेतेपदाची महत्त्वपूर्ण बैठक विधीमंडळात पार पडली. यावेळी दिलीप वळसे पाटलांकडून गटनेतेपदाचा प्रस्ताव मांडण्यात आला. हा प्रस्ताव एकमताने मंजूर करण्यात आला. छगन भुजबळ यांच्याकडून सुनेत्रा पवार यांच्या नावाला अनुमोदन देण्यात आले. यानंतर सुनेत्रा पवार यांची एकमताने गटनेतेपदी निवड करण्यात आली. यानंतर धनंजय मुंडे, छगन भुजबळ, प्रफुल पटेल, सुनील तटकरे, संजय बनसोडे, सुनील तटकरे हे मुख्यमंत्र्यांच्या भेटीसाठी वर्षा बंगल्यावर रवाना झाले. मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन राष्ट्रवादीच्या नेत्यांनी गटनेते म्हणून सुनित्रा पवार यांची निवड झाल्याचे पत्र दिले. यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ते पत्र राज्यपालांना पाठवण्यात आले.

**सुनेत्रा पवारांनी घेतली उपमुख्यमंत्रीपदाची शपथ**

त्यानुसार, शपथविधी सोहळा संध्याकाळी ५ वाजता पार पडला. मर्यादित लोकांना शपथविधीसाठी उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली होती. शपथविधी सोहळा अवघ्या १० मिनिटांत अत्यंत साधेपणाने पार पडला. यावेळी सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. सुनेत्रा पवार या महाराष्ट्रातील पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत.

**शपथविधीनंतर सुनेत्रा पवार तातडीने बारामतीकडे रवाना**

उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार तातडीने बारामतीला रवाना होणार असल्याची माहिती समोर आली आहे. अजित पवार यांचा दहावा होईपर्यंत त्या बारामतीतच मुक्काम करणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, दुखवटा संपेपर्यंत त्या नेते व कार्यकर्त्यांची भेट घेणार असल्या तरी, या काळात कोणतेही हार, तुरा किंवा सत्कार स्वीकारणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. शोकाकुल वातावरणात साधेपणा आणि संवेदनशीलता जपण्यावर त्यांचा भर असणार आहे.

**सुनेत्रा पवार यांचा परिचय**

सुनेत्रा पवार यांचा जन्म १८ ऑक्टोबर १९६३ रोजी तेर (जि. धाराशिव) याठिकाणी झाला. माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांची बहीण असलेल्या सुनेत्रा पवार यांना राजकीय वारसा जन्मतःच लाभलेला होता. १९८५ मध्ये त्यांचा विवाह अजित पवार यांच्यासोबत झाला. लग्नानंतर काटेवाडी (ता. बारामती) येथे आल्यावर त्यांनी सामाजिक कार्याला सुरूवात केली. काटेवाडीमध्ये ग्रामस्वच्छता चळवळीची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली. अगदी पहाटे पासून स्वतः हातात खराटा घेऊन कामाला सुरुवात करणाऱ्या सुनेत्रा पवार यांनी संपूर्ण गावालाच या अभियानात सहभागी केलं. त्यांच्या या प्रेरणेतून ग्रामस्वच्छता अभियानात काटेवाडी राज्यात प्रथम क्रमांकावर आलं. या कार्याची दखल घेत देश-विदेशातून अभ्यासकांनी काटेवाडीला भेट दिली.

# आज सादर होणार केंद्रीय अर्थसंकल्प; वंदे भारत आणखी सुसाट धावणार!

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – देशाचा केंद्रीय अर्थसंकल्प रविवारी सादर होणार असून, अर्थमंत्री निर्मला सीतारमण सलग नवव्यांदा बजेट मांडून नवा इतिहास रचणार आहेत. यंदाच्या अर्थसंकल्पात भारतीय रेल्वेसाठी केंद्र सरकार आपली तिजोरी खुली करण्याची शक्यता असून, रेल्वेच्या आधुनिकीकरणासाठी सुमारे २.७० लाख कोटी ते २.८० लाख कोटी रुपयांच्या विक्रमी निधीची घोषणा होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. रेल्वे प्रवास अधिक आधुनिक, वेगवान आणि आरामदायी बनवण्यासाठी सरकारचे विशेष लक्ष आहे. यामध्ये प्रामुख्याने वंदे भारत स्लीपर ट्रेन सुरू करण्यावर भर दिला जाणार आहे, ज्यामुळे लांब पल्ल्याचा प्रवास प्रवाशांसाठी सुसह्य होईल. याशिवाय, नवीन रेल्वे मार्गांचा विस्तार करणे, जुन्या रुळांचे नूतनीकरण आणि रेल्वे स्थानकांचे हायटेक सुशोभीकरण यांसाठी या निधीचा मोठा हिस्सा वापरला जाण्याचा अंदाज आहे.

**जूनपर्यंत ८ वंदे भारत स्लीपर गाड्या धावणार**

केंद्र सरकार येत्या जून महिन्यापर्यंत ८ नव्या 'वंदे भारत स्लीपर' गाड्या सुरू करण्याच्या तयारीत असून, संपूर्ण आर्थिक वर्षात अशा १२ आधुनिक गाड्या प्रवाशांच्या सेवेत रुजू होतील. रात्रीचा प्रवास अधिक सुखकर व्हावा, यासाठी या ट्रेनची विशेष रचना करण्यात आली आहे. मध्यमवर्गीय प्रवाशांचा विचार करून सरकार 'अमृत भारत' रेल्वेचाही विस्तार करणार आहे. मार्च महिन्यापर्यंत या रेल्वेचे नवीन आणि प्रगत 'व्हर्जन' पाहायला मिळेल. विशेष म्हणजे, रेल्वेच्या सुरक्षेसाठी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी पहिल्यांदाच आर्टिफिशियल




इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा मोठा वापर केला जाणार आहे. याव्यतिरिक्त, रेल्वे प्रवाशांची सर्वात मोठी डोकेदुखी असलेल्या 'वेटिंग लिस्ट'च्या समस्येवरही सरकार ठोस पाऊल उचलत आहे. पुढील दोन वर्षांत वेटिंग लिस्ट पूर्णपणे संपवण्यासाठी अतिरिक्त डबे जोडणे आणि नवीन पिढीच्या वेगवान रेल्वे गाड्यांची निर्मिती करण्यावर बजेटमध्ये भर दिला जाणार आहे.

**७० अधिकारी आता आठवडाभर 'नजरकैदेत'**

केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ (ईींवसशीं २०२६) च्या सादरीकरणाची जय्यत तयारी अंतिम टप्प्यात आली असून, आज २७ जानेवारी रोजी दिल्लीतील नॉर्थ ब्लॉक येथे पारंपरिक हलवा समारंभ उत्साहात पार पडला. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी बजेट प्रक्रियेशी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना स्वहस्ते मिठाई भरवून अर्थसंकल्पाच्या छपाईला अधिकृत हिरवा कंदील दाखवला.

# उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर लगेच सुनेत्रा पवार बारामतीला रवाना

**मुंबई (प्रतिनिधी)** – राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातातील अकाली निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार या राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी विराजमान होणार आहेत. सुनेत्रा पवार आज (३१ जानेवारी) उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. आज संध्याकाळी ५ वाजता सुनेत्रा पवारांचा शपथविधी होणार आहे. त्या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री असतील. दरम्यान, उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर सुनेत्रा पवार या तातडीने बारामतीला रवाना होणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, सुनेत्रा पवार या आज उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर लगेच बारामतीला दाखल होणार आहेत. अजित पवारांचा दहावा होईपर्यंत सुनेत्रा पवार बारामतीमध्येच थांबणार आहेत. दुखवटा संपेपर्यंत नेते कार्यकर्त्यांना भेटणार आहेत, मात्र, कोणतेही हार-तुरे स्विकारणार नसल्याची माहिती मिळत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा गटनेते पदासाठी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव पक्षाचे नेते दिलीप वळसे पाटील (ऊळश्रळि थिरश्रीश झरींळश्र) यांनी मांडलाय. तर या प्रस्तावाला पक्षाचे जेष्ठ नेते म्हणून मंत्री छगन भुजबळ यांनी अनुमोदन दिलंय. परिणामी, सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादीच्या विधिमंडळ गटनेतेपदी एकमताने निवड झाली आहे. आता सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास सुनेत्रा पवार उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहे. त्यामुळे अजित पवारांच्यानंतर इथून पुढे सुनेत्रा पवार यांच्या खांद्यावर पक्षाची धुरा असणार आहे.

दरम्यान, सुनेत्रा पवारांचा शपथविधी आज सायंकाळी ५ वाजता होणार आहे. सायंकाळी ५ ते ५ वाजून १२ मिनिटांपर्यंत हा शपथविधी सोहळा चालणार आहे. यावेळी मंत्री म्हणून पद आणि गोपनीयतेची शपथ दिली जाणार आहे. तर अतिरिक्त पदभार असलेले राज्यपाल आचार्य देवव्रत हे यावेळी शपथ देणार आहे. सोबतच आज फक्त सुनेत्रा पवारांचाच शपथविधी सोहळा होणार आहे.

अजित पवारांकडे उपमुख्यमंत्रिपदासोबतच अर्थ आणि इतर महत्वाचे खातेही होते. पण उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर अर्थ खाते वगळता इतर खात्याची जबाबदारी सुनेत्रा पवार यांच्याकडेच राहणार आहे. सुनेत्रा पवार यांच्याकडे राज्य उत्पादन शुल्क आणि क्रीडा विभागाची जबाबदारी कायम राहणार आहे. अर्थसंकल्प अधिवेशनानंतर कदाचित अर्थ खात्याची जबाबदारी पुन्हा सुनेत्रा पवार यांना मिळू शकते.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांना अर्थखातं नाहीच; अर्थ खातं मुख्यमंत्र्यांकडेच

**मुंबई (प्रतिनिधी)** – अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर पक्षाची आणि उपमुख्यमंत्रिपदाची सूत्रे सुनेत्रा पवार यांनी अत्यंत धीरोदात्तपणे समोर येऊन आपल्या ताब्यात घेतली. शनिवारी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांच्या तसेच आमदारांच्या समक्ष त्यांचा शपथविधी कार्यक्रम झाला. अत्यंत साधेपणाने शपथविधीचा कार्यक्रम पार पडला. सुनेत्रा पवार यांच्या रुपाने महाराष्ट्राला पहिल्या महिला मुख्यमंत्री मिळाल्या आहेत. शपथविधीच्या दोन तासांतच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खातेवाटपही जाहीर केले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनेत्रा पवार यांच्यावर क्रीडा, राज्य उत्पादन शुल्क आणि अल्पसंख्याक विकास या खात्यांची जबाबदारी सोपवली. अजित पवार यांच्याकडे असलेले वित्त आणि नियोजन खाते तूर्त सुनेत्रा पवार यांच्याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सोपवले नाही. राष्ट्रवादीला अर्थखाते देण्यासाठी भाजपच्या वरिष्ठांचा हिरवा कंदील नव्हता.

विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सदस्यांच्या बैठकीत एकमुखाने सुनेत्रा पवार यांची गटनेतेपदी निवड करण्यात आली. तसेच विधिमंडळ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार सुनेत्रा अजितदादा पवार



यांना देण्याबाबतचा ठरावही मंजूर करण्यात आला. म्हणजेच व्हीप काढण्याचे आणि विधिमंडळ कामकाजाचे सर्वाधिकार सुनेत्रा पवार यांना देण्यात आले आहेत.

पक्षाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुलभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांच्या अध्यक्षतेखाली विधिमंडळ पक्षाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत हे दोन्ही ठराव घेण्यात आले.

## बजेटकडून अपेक्षा- सोने, चांदी स्वस्त होऊ शकतात

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – १ फेब्रुवारी रोजी सादर होणाऱ्या बजेटनंतर सोने-चांदी खरेदी करणे स्वस्त होऊ शकते. सरकार यावर लागणारे कस्टम ड्युटी ६% वरून कमी करून ४% करू शकते. जर असे झाले तर १० ग्रॅम सोने सुमारे ३ हजार आणि चांदी ६ हजार रुपयांनी स्वस्त होऊ शकते.

२०२५ मध्ये सोने ७५% आणि चांदी १६७% वाढली आहे. सध्या, म्हणजेच जानेवारी २०२६ मध्ये, १० ग्रॅम २४ कॅरेट सोने १.५० लाख आणि एक किलो चांदी ३.५० लाख रुपयांना मिळत आहे.

उद्योग क्षेत्रात स्पर्धा वाढली, दरमहा १० विमाने येतील

## तीन मोठ्या एअरलाईन्स २ वर्षांत २४० विमाने खरेदी करतील

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – घरगुती विमान उद्योगात स्पर्धा वाढली आहे. सतत वाढती मागणी लक्षात घेता, इंडिगो, एअर इंडिया आणि अकासा एअर या तीन मोठ्या विमान कंपन्या त्यांच्या ताफ्याचा आकार आक्रमकपणे वाढवत आहेत. या कंपन्या पुढील दोन वर्षांत (२०२७ च्या अखेरपर्यंत) २४० नवीन विमाने खरेदी करतील किंवा भाडेतत्त्वावर घेतील. याचा अर्थ दरमहा सुमारे १० नवीन विमाने भारतात येतील. याचा फायदा सामान्य विमान प्रवाशांनाही मिळेल.

भारतात प्रवासाचे मार्ग वेगाने बदलत आहेत. लोक ट्रेनमधून विमानाने प्रवास करण्याकडे वळत आहेत. नवीन विमाने आल्याने नवीन मार्ग सुरू होतील आणि सध्याच्या मार्गांवर स्पर्धा वाढेल. प्रवासाचे अधिक पर्याय उपलब्ध होतील. अधिक विमानांचा अर्थ आहे उत्तम कनेक्टिव्हिटी, नवीन सोयीस्कर विमाने आणि कदाचित कमी भाडे.

जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या भारताच्या विमान वाहतूक उद्योगात रोजगारात मोठी वाढ होण्याची अपेक्षा आहे. बोइंगनुसार, पुढील दीड-दोन दशकांत देशाला किमान ४५,००० पायलट, तेवढ्याच संख्येने तांत्रिक कर्मचारी आणि सुमारे पाच लाख केबिन क्रूची आवश्यकता असेल.

## होत्याच झालं नव्हतं... धावती लोकल पकडायला जीवावर बेतलं



**बदलापूर (प्रतिनिधी)** – सकाळची प्रचंड गर्दीची वेळ आणि प्रत्येक जण वेळेवर लोकल पकडून कामावर वेळेवर जाणयासाठी धावपळ करत असतो. पण हीच धावपळ, हीच गर्दी एका नवविवाहितेच्या जीवावर बेतली आहे.

सकाळची ८ वाजून ११ मिनिटांचीची सीएसएमटी ट्रेन आणि बदलापूर स्टेशनवर जमलेली प्रचंड गर्दी, प्रत्येक जण ट्रेन पकडण्यासाठी घाई करत होतेआणि अश्यातच २८ वर्षीय चेतना चंद्रशेखर देवरुखकर ही तरुणी सुद्धा ट्रेन पकडण्याच्या धावपळीत होती, काही कारणास्तव ट्रेन पकडायला तिला उशीर झाला. अन् ट्रेन स्टेशनवरून सुटली, तीच सुटलेली ट्रेन पकडण्यासाठी चेतना प्रयत्न करत होत्या. याच प्रयत्नात त्यांच्या तोल गेला आणि त्या ट्रेनखाली आल्या यात त्यांच्या दुर्दैवी मृत्यु झाला.

चेतना देवरुखकर यांचं वर्षभरापूर्वीच लग्न झालं होतं. त्या बदलापूर जुवेळी येथील जगन्नाथ गॅलेक्सीत वास्तव्याला होत्या. सुखी संसाराची स्वप्ने पाहत असतानाच काळाने त्यांच्यावर झडप घातली. त्यांच्या निधनानाची बातमी समजताच देवरुखकर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. पोलिसांनी अपघाती निधनाची नोंद केली आहे.

मुंबईत गर्दी वाढत चालल्याने ट्रेनला ही प्रचंड गर्दी असते. अनेकजण ट्रेनला लटकतात जीव धोक्यात घालून धावती लोकल पकडतात. आणि याच धावपळीत याच प्रवासात अनेकजण आपल्या जीवाला मुकतात. अति घाई संकटात नेई, एक ट्रेन चुकली तर चुकूदेत आपल्या आयुष्य लाखमोलाचा असत. याचे भान प्रवाशांनी राखणे गरजेचे आहे.

'राष्ट्रवादी'चे विलीनीकरण का थांबले?

# पटेल-तटकरेंचा विरोध, भाजपचा खोडा की, सुप्रिया सुळेंच्या कार्यशैलीवर नाराजी

**मुंबई (प्रतिनिधी)** – राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रीकरणाच्या चर्चांना वेग आला असताना सुनेत्रा पवार यांच्या उपमुख्यमंत्रीपदाच्या शपथविधीने नवे राजकीय प्रश्न निर्माण केले आहेत. या घाईगडबडीच्या निर्णयामागे पक्षांतर्गत पटेल-तटकरेंचा विरोध आहे की भाजपचा राजकीय खोडा, असा सवाल उपस्थित होत आहे. शरद पवार यांना माहिती नसताना घेतलेल्या निर्णयावरून वाद अधिकच तीव्र झाला आहे.

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी भाजपवर सहानुभूतीचा फायदा घेण्याचा आरोप करत या निर्णयाच्या टिकाऊपणावरच शंका व्यक्त केली आहे. त्यामुळे हा शपथविधी केवळ औपचारिक न राहता, राष्ट्रवादीच्या भवितव्याशी जोडला गेला आहे. तर दुसरीकडे सुप्रिया सुळे यांच्या कार्यशैलीवर अनेक जण नाराज असल्याची चर्चाही समोर येतेय. त्यामुळे विलीनीकरण नेमके का थांबले, याची सारीच कारणे जाणून घेऊयात.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर राज्याच्या राजकारणात वेगाने घडामोडी सुरू झाल्या आहेत. त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आज सायंकाळी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार आहेत. या



निर्णयामुळे राजकीय वर्तुळात आश्चर्य आणि चर्चेची लाट पसरली आहे. सुनेत्रा पवार या राज्याच्या पहिल्या महिला उपमुख्यमंत्री ठरणार असल्याने या शपथविधीला वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र, हा निर्णय इतक्या घाईगडबडीत का घेतला गेला, यावरून अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. शपथविधीपूर्वी विधानभवनात राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधिमंडळ पक्षाची महत्त्वाची बैठक झाली असून, त्या बैठकीत सुनेत्रा पवार यांची विधिमंडळ गटनेतेपदी निवड झाली आहे.

सर्व घडामोडींमध्ये एक महत्त्वाची बाब समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी माध्यमांशी बोलताना या शपथविधीबाबत त्यांना कोणतीही माहिती नसल्याचे स्पष्ट केले होते. शरद पवार म्हणाले की, 'राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटाचे विलीनीकरण व्हावे ही अजित पवारांचीही इच्छा होती. ती नक्कीच पूर्ण व्हायला हवी. अजित, शशिकांत शिंदे आणि जयंत पाटील यांनी दोन्ही गटांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा सुरू केली होती. विलीनीकरणाची तारीखही निश्चित झाली होती. १२ फेब्रुवारीला विलीनीकरणाची घोषणा होणार होती, पण दुर्दैवाने, अजित त्याआधीच आम्हाला सोडून गेले.' जयंत पाटील यांनीही आज माध्यमांशी बोलताना याचीच पुनरुक्ती केली.

दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार उत्तम जानकर यांनी या शपथविधीवरून भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, कोणालातरी लाभ मिळवून देण्यासाठी हा शपथविधी इतक्या तातडीने केला जात आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर अजूनही दुःखाची छाया कायम असताना अशा प्रकारे राजकीय निर्णय घेणे योग्य नाही, असे त्यांनी म्हटले. सहानुभूतीचा फायदा घेण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांच्या मते, हा निर्णय पवार कुटुंबीयांशी चर्चा करून, सर्वांच्या सहमतीने व्हायला हवा होता.


**टी.सी. हरवली**

माझी सय्यद फारुख अहेमत पि. सय्यद मुनीर अहेमद या नावाची दहावी नापासची टी.सी. खडकपुरा ते वजिराबाद ऑटो प्रवासात हरवली आहे. तरी कुणाला सापडल्यास आणून द्यावे आणून देणाऱ्यास योग्य ते बक्षीस देण्यात येईल.

- संपर्क पत्ता -
दुल्हेशाह रहेमान नगर, वाघी रोड नांदेड
मो.नं. ८२०८२८८५८३

**Change In Name**

My Old Name is Manojkumar Shreeshreemal which now I am changing as New Name Manojkumar Shrishrimal Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

- Address -
Manojkumar Shrishrimal
Nava Mondha, Nanded
Mo.No. 9890020891

**Change In Name**

My Old Name is Sarala which now I am changing as New Name Sarla Shrishrimal Hence forth my all Correspondance will be done as per my new name Please consider the Same.

- Address -
Sarla Shrishrimal
Nava Mondha, Nanded
Mo.No. 9890020891

**Change In Address**

I SHAIKH MUNTAZIR Decleared that, My Old Address is H.No.9-5-1766, Near Masjide Hamza, Mittal Nagar, Degloor Naka, Nanded 431604 (M.S.). I am Chaniging as new Address. H.No. 9-5-1762, Mittal Nagar, Near Hamza Masjid, Nanded Maharashtra Nanded Rural 431604.

**जाहिरप्रगटन**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, बिलोली यांचे न्यायालय**
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ३१/२०२६
**गोदावरी व ईतर विरुध्द निरंक**

**अर्जदार** :- १. गोदावरी गंगाराम लिमशेटे, वय- ६० वर्षे,
२. राजु गंगाराम लिमशेटे, वय- ४० वर्षे,
दोघे रा. हुनगुंदा, ता. बिलोली जि. नांदेड

**विरूध्द**
निरंक
विषय :- वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत....

ज्याअर्थी अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज सादर केला असुन त्यात असे कथन केले आहे की, मयत **गंगाराम रामजी लिमशेटे** यांचे अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ हा मुलगा आहे. मयत हे मौजे हुनगुंदा ता. बिलोली जि.नांदेड येथील रहीवाशी आहेत. मयत **गंगाराम रामजी लिमशेटे** यांचा मृत्यु दिनांक ०९/०९/२०२४ रोजी आजारपणामुळे मौ. हुनगुंदा येथे झाला आहे. मयताच्या पश्चात अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस असून इतर कोणीही मयताचे वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे.

हे की, मयत **गंगाराम रामजी लिमशेटे** यांचे कायदेशिर वारस म्हणुन वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्जदारांनी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. तरी, उपरोक्त प्रकरणी सर्व संबंधितास कळविण्यात येते की, वरील अर्जदारच्या नावे वारसा प्रमाणपत्र देणे बाबत कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो लेखी स्वरूपात स्वतः हजर राहून अथवा त्यांचे विधिज्ञ यांचे मार्फत **दिनांक १०/०३/२०२६** रोजी किंवा तत्पूर्वी या न्यायालयात सादर करावा. अन्यथा कोणासही कांही आक्षेप/ उजर नाही असे समजुन प्रकरणात पुढील कायदेशीर आदेश निर्गमीत करण्यात येतील.

आज दि. २८ जानेवारी, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्याने देण्यात आले.

सहा. अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, बिलोली


**पाहिजे**

कुशल आय.टी.आय. इलेक्ट्रीशियन/मोटार वाईडींग अनुभव व तसेच आय.टी.आय. टर्नर ट्रेड अनुभव किमान ५ वर्षे असावा. कमीत कमी वेतन १५,०००/- रू.
इच्छुकांनी खालील पत्यावर संपर्क करावा.
**-: संपर्क पत्ता :-**
**उषा इलेक्ट्रीकल वर्क्स,**
**सिडको एम.आय.डी.सी. नांदेड**
**मो.नं. ९९६०१२८१९१**

**कुत्रीचे पिल्ले विकणे आहे**

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८



**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१, ९८६०७२१३५६

# गोदातीर समाचार

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## नायगाव जि.प. बांधकाम कार्यालयात अभियंत्याचा मृतदेह आढळला; जिल्ह्यात खळबळ

### दोन दिवसांपासून होते बेपत्ता; घातपात की आत्महत्या? पोलीस तपास सुरू

**नायगाव बाजार (प्रतिनिधी)**–नायगाव शहरातील येथील बैल बाजार परिसरात असलेल्या जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग कार्यालयात शुक्रवारी (दि. ३१) एका सहाय्यक अभियंत्याचा मृतदेह आढळून आल्याने मोठी खळबळ उडाली आहे. विलास किशनराव बल्लुरे (वय ४०, रा. लांडगेवाडी, ता. लोहा) असे मृत अभियंत्याचे नाव असून, ते गेल्या दोन दिवसांपासून बेपत्ता होते.



मिळालेल्या माहितीनुसार, विलास बल्लुरे हे नायगाव येथील बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता म्हणून कार्यरत होते. दोन महिन्यांपूर्वीच त्यांची देगलूर येथे पदोन्नती झाली होती, मात्र सध्या ते नायगाव येथेच प्रतिनियुक्तीवर सेवा बजावत होते. बुधवारपासून ते घरी न परतल्याने नातेवाईक त्यांचा शोध घेत होते.

**असा उघडकीस आला प्रकार**–शुक्रवारी सकाळी जुन्या पंचायत समितीच्या इमारतीतील बांधकाम विभागाच्या कार्यालयाला बाहेरून कुलूप होते, मात्र कार्यालयासमोर एक दुचाकी धूळखात उभी असल्याने नागरिकांना संशय आला. काही जणांनी इमारतीच्या वरच्या मजल्यावर जाऊन पाहिले असता, तिथे बल्लुरे यांचा मृतदेह दिसून आला. ही माहिती वाऱ्यासारखी शहरात पसरताच बघ्यांची मोठी गर्दी जमली होती.

**पोलिसांकडून पंचनामा** – घटनेची माहिती मिळताच नायगाव पोलिसांनी तात्काळ धाव घेऊन घटनास्थळाची पाहणी केली. मृतदेह ताब्यात घेऊन उत्तरीय तपासणीसाठी नायगावच्या शासकीय रुग्णालयात पाठवण्यात आला. ही घटना नेमकी कधी आणि कशामुळे घडली, हे अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही. या प्रकरणाचा नायगाव पोलिस सर्व बाजूंनी तपास करीत आहेत.

**कुटुंबावर शोककळा**–मयत विलास बल्लुरे यांच्या पश्चात पत्नी व दोन लहान मुले असा परिवार आहे. त्यांच्या निधनामुळे लांडगेवाडी व नायगाव परिसरात शोककळा पसरली असून, त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांनी हळहळ व्यक्त केली आहे.

## पोलीस उपमहानिरीक्षक उमाप यांच्या पथकाचे नांदेड व लातूरमधील जुगार अड्ड्यांवर छापे

### गावठी पिस्तूल, साडेतीन लाख रुपयांची रोकड, ३९ मोबाईलसह जुगार साहित्य जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड परिक्षेत्रातील अवैध धंद्यांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी यांच्या विशेष पथकांनी मोठी कारवाई केली आहे. ज्यात नांदेड शहरातील इतवारा आणि लातूर जिल्ह्याच्या उदगीर परिसरात चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर छापे टाकण्यात आले. या कारवाईत एका पिस्तूलासह साडे तीन लाख रुपयांची रोकड, २७ मोबाईल आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले आहे.

सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीराम माचेवाड व पाच अंमलदारांचा समावेश असलेल्या सदर पथकाने ही कारवाई केली आहे. दि. २७ जानेवारी रोजी लातूर जिल्ह्यातील उदगीर ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत नाईक चौकातील रमेश गिरी याच्या जुगार अड्ड्यावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत नगदी १ लाख ५ हजार २०० रुपये व ७० हजार रुपयांचे १२ मोबाईल असा १ लाख ७५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी एकूण १३ जणांना ताब्यात घेवून त्यांच्याविरुद्ध उदगीर ग्रामीण ठाण्यात कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर या पथकाने दि. ३० जानेवारी रोजी नांदेड शहरातील इतवारा ठाण्याच्या हद्दीतील मच्छी मार्केटमध्ये चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर कारवाई केली. यावेळी जुगार खेळणाऱ्या २५ जणांकडून २ लाख ३४ हजार १०० रुपये व ४ लाख २८ हजार रुपयांचे २७ मोबाईल असा एकूण ६ लाख ६२ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यावेळी आरोपींविरुद्ध इतवारा पोलीस ठाण्यात कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या दरम्यान पथकाने इतवारा हद्दीत, आरोपी जयकिशन ऊर्फ जय राजेशसिंह ठाकूर (वय २१ वर्षे, रा. उल्हासनगर, तरोडा नाका) यास ताब्यात घेऊन त्याच्याकडून एक गावठी पिस्तूल व ३ जिवंत काडतूस असा एकूण ३१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून त्याच्याविरुद्ध इतवारा ठाण्यात कलम ३/२५ शस्त्र अधिनियम,१९५९ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

वरील दोन्हीही ठिकाणांच्या छाप्यात पथकाने एकूण ३ लाख ४० हजार रुपये रोकड व ५ लक्ष रुपयांच्या ३९ मोबाईलसह जुगाराचे साहित्य व १ गावठी पिस्तूल व ३ जिवंत काडतूस असा एकूण ८ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.




## ट्रॅक्टर चोरणारी टोळी जेरबंद

- सहा ट्रॅक्टर आणि दोन दुचाकी जप्त
- स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील अर्धापूर, नायगाव, भोकर आदी भागांतून ट्रॅक्टर चोरणारी टोळी मागील काही दिवसांपासून धुडघूस घालत होती. या टोळीच्या मुसक्या आवळण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक परिश्रम घेत असताना अखेर त्यांच्या हाती मोठी टोळी लागली. ट्रॅक्टर चोरणारी टोळी त्यांनी जेरबंद करून त्यांच्याकडून सतरा लाख रुपये किमतीचे सहा ट्रॅक्टर आणि ६० हजार रुपये किमतीच्या दोन दुचाकी जप्त केल्या आहेत.


स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी आपले सहकारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक वसंत आरसेवार यांच्या पथकाला सूचना दिल्या. यावरून दिनांक २९ जानेवारी रोजी सपोनि आरसेवार व त्यांच्या पथकातील अंमलदार मालाविरुद्धच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना गुप्त माहिती मिळाली. सुनिल सिंगणापुरे रा. सिधी, ता. उमरी हा त्याच्या साथीदारासह चोरीचे ट्रॅक्टर विक्री करण्याच्या हेतूने भोकर फाटा येथे आलेला आहे, अशी माहिती मिळाली. त्यावरून मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी भोकर फाटा येथे जाऊन सापळा लावून सुनिल मारोती सिंगणापूरे (वय ३१, रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड), उकंडी ऊर्फ बालाजी संभाजी पवार (वय ३७, रा. रुई ता. हदगाव, जि. नांदेड), बालाजी किशन गळाफोडे (वय ४३, रा. बाबूळगाव ता. जि. नांदेड), ओमकार अनिल पवार (वय १९, रा. पाथरड, ता. हदगाव, जि. नांदेड), मारोती ऊर्फ बजरंग पांडुरंग तेलंग (वय ३२, रा. रूई ता. नायगाव, जि. नांदेड), उत्तम धनराज राठोड (वय ४८, रा. मदनापूर, ता. किनवट, जि. नांदेड) यांना ताब्यात घेतले. त्यांची अधिक विचारपूस केली असता त्यांनी व त्याचे इतर तीन फरार सचिन तुळशीराम शिंदे रा. सिंधी ता. उमरी जि. नांदेड, मधुकर किशन गळाफोडे रा. बाबूळगाव ता. जि. नांदेड, शिवाजी बबन गडमवार वय २८ वर्षे रा. वसमत ह.मु. राहुल नगर परभणी या सर्वांनी मिळून मागील एक महिण्यापासून नांदेड जिल्ह्यातील सिंधी ता. उमरी, मांजरम ता. नायगाव, शेनी चिचबन ता. अर्धापूर, भोकर तालुक्यातील लामकनी शिवार या गावातून ६ ट्रॅक्टर चोरून त्याची विक्री करण्यासाठी दिग्रस ते देगाव जाणारी लोणार नदीच्या बाजूला ठेवले असल्याचे सांगितले. त्या ठिकाणी दोन पंचासमक्ष जॉन डियर कंपनीचे ५ व स्वराज कंपनीचा १ असे ६ ट्रॅक्टर व गुन्ह्यात वापरलेल्या दोन दुचाकी असा १७ लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## नांदेड जिल्हा बँकेच्या बैठकीत स्व. अजितदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण

**नांदेड (प्रतिनिधी)** – महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांचे विमान अपघातात बारामती विमानतळावर दि. २८ जानेवारी रोजी अकाली निधन झाले. शनिवारी झालेल्या नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या बैठकीत बँकेचे अध्यक्ष माजी खा. भास्करराव पाटील खतगावकर व सर्व संचालक मंडळाच्या वतीने स्व. अजितदादा पवार यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.




कार्यक्षम, विकासाची दूरदृष्टी, स्पष्टवक्ता, शासनावर पकड असणारे नेते स्व. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनामुळे महाराष्ट्राची फार मोठी हानी झाली असल्याचे बँकेचे अध्यक्ष माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांनी श्रध्दांजली अर्पण करताना म्हटले.










**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com